QR कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

वर्ष - ३ रे अंक - २७१ वा अमरावती (महाराष्ट्र) शनिवार दि. २९ नोव्हेंबर २०२५ संपादक - डॉ. शुभांगी जोशी मुल्य - १ रु. पृष्ठ -६

## राहुल गांधींविरोधातील खटल्यात सावळा गोंधळ

### सावरकर मानहानी प्रकरणात पुराव्यांची सीडी निघाली ब्लँक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९नवी दिल्ली**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा कथित अवमान केल्याप्रकरणी लोकसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्याविरोधात सादर करण्यात आलेली पुराव्यांची सीडी ब्लँक निघाल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. हा प्रकार गुरुवारच्या सुनावणीत घडला. पण तो आज समोर आला. या घटनेमुळे या प्रकरणी राहुल गांधींना कोर्टात खेचण्याच्या प्रयत्नांना मोठी खिळ बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



राहुल गांधी यांनी २०१९ मध्ये लंडनमध्ये दिलेल्या एका मुलाखतीत विनायक दामोदर सावरकर यांच्याविषयी एक कथित वादग्रस्त विधान केले होते. या प्रकरणी सावरकरांचे पणतू सत्यकी सावरकर यांनी त्यांच्या विरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता. त्यांनी राहुल यांच्या भाषणाचे रेकॉर्डिंग असलेली एक सीडी सीलबंद लिफाफ्यात कोर्टात सादर केली होती. याच सीडीच्या आधारावर कोर्टाने राहुल गांधी यांच्याविरोधात समन्स जारी केला होता. गुरुवारी न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांच्यापुढे सत्यकी सावरकर यांची मुख्य उलटतपासणी सुरू होती. त्यात ही सीडी मुख्य पुरावा म्हणून सादर करण्यात आली.

**कोर्टाचे सीडी चालवून पाहण्याचे आदेश, पण...**

यावेळी कोर्टाने ही सीडी चालवून पाहण्याचे आदेश दिले. त्यानुसार ती उघडून चालवण्याचा प्रयत्न झाला. पण त्यात कोणताही डेटा नसल्याचे निष्पन्न झाले. यामुळे कोर्टरूममध्ये उपस्थित सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. सीडी कोरी निघाल्याचे पाहून सत्यकी सावरकरांचे वकील संग्राम कोल्हटकर यांनाही आश्चर्याचा धक्का बसला. त्यांनी कोर्टाला आठवण करून दिली की, याच सीडीच्या आधारावर कोर्टाने राहुल गांधींविरधात कारवाई सुरू केली होती. त्यानंतर त्यांनी कोर्टाला यूट्यूबवर राहुल गांधींचे ते कथित भाषण लावण्याची परवानगी मागितली. पण कोर्टाने त्यांची विनंती साफ फेटाळून लावली.

## नीलेश राणे शिवसेनेत बळीचा बकरा ठरले : नीतेश राणे यांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९मुंबई**

सत्ताधारी शिवसेनेत आमदार नीलेश राणे यांना बळीचा बकरा ठरले आहेत. त्यामुळेच शिवसेनेचा एकही मंत्री त्यांच्या समर्थनार्थ अद्याप पुढे आला नाही, असा आरोप नीलेश यांचे बंधू तथा भाजपचे मंत्री नीतेश राणे यांनी शनिवारी केला. कोकणात भाजप नेते नारायण राणे यांना संपवण्याचा कट सुरू असल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.

कोकणात सध्या नगरपालिका निवडणुकांचा फड रंगला आहे. शिवसेना आमदार नीलेश राणे यांनी २ दिवसांपूर्वी मालवण येथील भाजप पदाधिकारी विजय केनवडेकर यांच्या घरात छापेमारी केली. त्यात त्यांना पैशांनी भरलेली एक बॅग सापडली. या प्रकरणी त्यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र



चव्हाण यांच्यावर टीका केली. त्यानंतर आज त्यांच्याविरोधात केनवडेकर यांच्या घरात बेकायदा शिरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे मंत्री नीतेश राणे यांनी शिवसेनेवर निशाणा साधत त्यांची जोरदार पाठराखण केली आहे.

**नीलेश यांना शिवसेनेत एकटे पाडण्याचा प्रयत्न**

नीतेश राणे म्हणाले, नीलेश राणे यांना बळीचा बकरा बनवले जात आहे. शिवसेनेत त्यांना एकटे पाडले जात आहे. यामुळेच शिवसेना दुसरा कोणताही नेता त्यांच्या समर्थनार्थ बोलत नाही. ते का बोलत नाहीत? मंत्री उदय सामंत तिकडे येऊन रवींद्र चव्हाण यांच्यावर टीका करत नाहीत? नीलेश यांच्या समर्थनार्थ त्यांच्यातील एकही नेता का उतरत नाही? तिकडे गुलाबराव पाटील राज्यातील एका नगरपालिकेसाठी नारायण राणेंची कशी खिल्ली उडवत आहेत त्याचा व्हिडिओ दाखवू का? त्यावरही कुणी बोलत नाही. फक्त नीलेश राणेच बोलततात.

दीपक केसरकर रवींद्र चव्हाण यांचे नाव घेत नाहीत. केसरकर स्वतः मंत्री होते. आता आमदार आहेत. त्यांनी याविषयी उत्तर दिले पाहिजे. या प्रकरणी उगीच कुणी राजकारण करू नये. आमच्या रवींद्र चव्हाण यांच्यावर कुणीही आरोप करू नये. त्यांनी लोकसभा निवडणुकीत नारायण राणे यांच्यासाठी काय केले, विधानसभेला आमच्यासाठी काय केले हे आम्हाला चांगलेच ठावूक आहे. त्यामुळे या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासोबत बसून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे नीतेश राणे म्हणाले.

## लग्नाला निघालेले दाम्पत्य गूढपणे बेपत्ता

### खामगाव – मलकापूर दरम्यान झाले बेपत्ता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९जळगाव**

तेलंगणातून जळगावच्या दिशेने निघालेले एक दाम्पत्य अर्ध्या रस्त्यातून गूढपणे बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. या दाम्पत्याचे शेवटचे लोकेशन बुलढाणा जिल्ह्यातील वडनेर गावालगत आढळले. त्यामुळे त्यांचा घातपात झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिस सध्या या दाम्पत्याचा कसून शोध घेत आहेत.



या प्रकरणी रमेश पाटील यांनी नांदुरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, त्यांचे चुलतबंधू पद्मसिंह दामू पाटील हे तेलंगणात त्यांची पत्नी नम्रता व मुलीसह राहतात. ते तेलंगणा राज्यातील सीतापुरम येथील एका खासगी सिमेंट कंपनीत नोकरीस आहेत. २७ नोव्हेंबर रोजीस काळी ६ च्या सुमारास पद्मसिंह आपली पत्नी व मुलीसह घरच्या लग्नासाठी जळगावला येण्यासाठी निघाले. ते त्यांच्या कारने गावी येत होते. सकाळी घरून निघाल्यानंतर त्यांचे त्यांच्या भावाशी बोलणे झाले. त्यानंतर रात्री १० वाजेपर्यंत ते घरी पोहोचणे अपेक्षित होते.

**वडनेर भोलजी गावालगत तुटला संपर्क**

पण रात्रीचे १० वाजले तरी ते घरी पोहोचले नाही. आणखी काही वेळ वाट पाहून रमेश यांनी पद्मसिंह यांना फोन करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा मोबाईल बंद येत होता. त्यानंतर त्यांनी त्यांची वहिणी तथा पद्मसिंह यांची पत्नी नम्रता यांना फोन केला. त्यांचाही फोन बंद येत होता. त्यानंतर कालपर्यंत म्हणजे २८ नोव्हेंबरपर्यंत नातेवाईकांनी त्यांचा फोन ट्राय केला. त्यांचा शोध घेतला. पण ते सापडले नाही. अखेर त्यांनी पोलिसांकडे धाव घेऊन ते बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी त्यांचा शोध सुरू केला. त्यात बेपत्ता दाम्पत्याचे शेवटचे लोकेशन बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव ते मलकापूर दरम्यान महामार्गावर असणाऱ्या वडनेर गावालगत आढळले.वडनेर भोलजी येथूनच त्यांचा संपर्क तुटला. त्यामुळे आता पोलिस वडनेर परिसरात या दाम्पत्याचा शोध घेत आहेत. त्यांनी या दाम्पत्याचा घातपात झाल्याचाही संशय व्यक्त केला आहे. या घटनाक्रामुळे पद्मसिंह यांच्या कुटुंबीय व नातेवाईकांत भीतीचे सावट पसरले आहे.

**जळगाव शहरात चादर गँगचा धुमाकूळ**

दुसरीकडे, जळगाव शहरात चादर गँगने धुमाकूळ घातला आहे. या गँगमध्ये काही मुलींचाही समावेश आहे. या गँगने शहरातील सावखेडा भागातीलवर्धमान सीबीएससी इंग्लिश मीडियम स्कूल, जी एच रायसोनी पब्लिक स्कूल, गुरुकुल किड्स व शानबाग विद्यालय या ४ शाळांना लक्ष करून २ लाख रुपयांची रोकड लंपास केली. ही रोकड विद्यार्थ्यांची फी व शिष्यवृत्तीची असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी जळगाव तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तर 'त्यांची' बोटे छाटलीच पाहिजे, माजी खासदार नवनीत राणांचे विधान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अकोला**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धर्मध्वज लावल्यावर पाकिस्तानी लोक बोट दाखवत आहेत.अयोध्येच्या प्रभू श्रीराम मंदिरावर जे बोट दाखवतात, त्यांची बोटे छाटायलाच हवी. धर्म, देश, विचार व आमच्यावर बोट उचलणाऱ्यांची बोटे कापलीच पाहिजे, असे वादग्रस्त विधान अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी आज मूर्तिजापूर येथे केले.नगर पालिका व नगर पंचायतीच्या निवडणुकीत प्रचार शिगेला पोहोचला आहे.

भाजप नेत्यांकडून वारंवार कापणे, छाटण्याची भाषा बोलल्या जात आहे. मूर्तिजापूर येथील सभेत नवनीत राणा यांनी काँग्रेसवर टीका करतांना वादग्रस्त विधान केले. मूर्तिजापूर नगर पालिका व बार्शीटाकळी नगर पंचायतीतील उमेदवारांच्या प्रचारार्थ मूर्तिजापूर येथे आयोजित सभेत त्या बोलत होत्या. यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, आ. हरीश पिंपळे, आ. वसंत खंडेलवाल, आ. विक्रांत पाटील, जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, डॉ. अमित कावरे, गिरीश



जोशी आदींसह उमेदवार व पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.

पुढे नवनीत राणा म्हणाल्या, 'काँग्रेस म्हणतात की आम्ही जातीभेद करतो. मात्र, त्यांनी जातीभेद पेरले म्हणून हे सर्व बाहेर आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी धर्मध्वज लावला, त्याकडे पाकिस्तानचे लोक बोट दाखवतात. जे बोट ऐतिहासिक राम मंदिराकडे दाखवतील, ते छाटायलाच हवी. जे आमचे विचार, देश, धर्माकडे बोट दाखवतील, त्यांची बोटे कापलीच पाहिजे. यामध्ये दुसरा कोणताही विचार करता येणार नाही. देश, मातीवर प्रेम करणारे आम्ही लोक असून विचारासाठी कार्य करतो.' विकासाला प्राधान्य देणाऱ्या भाजपसोबत राहणे आवश्यक आहे, असे देखील नवनीत राणा यांनी सांगितले. अमरावती, मूर्तिजापूर काँग्रेसमुक्त केले असून तीच परंपरा आगामी निवडणुकीतही कायम राहील, असा विश्वास नवनीत राणा यांनी व्यक्त केला.

## मी कोणावरही टीका करत नाही, आमच्याकडे नीती, नियती आहे अन् निधी देखील आहे; देवेंद्र फडणवीसांचे सूचक वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९चंद्रपूर**

राज्यातील नगरपरिषद निवडणूक रणसंग्रामातील मुख्यमंत्र्यांची आजची पहिली सभा चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती शहरात पार पडली. भद्रावती शहरात विकासाच्या योजना राबविण्यासाठी भाजपला निवडून देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केलंय. आपण प्रचार सभेत विरोधकांवर टीका करत नाही. आम्ही सकारात्मक विचार घेऊन आलोय. आम्ही एक विकास आराखडा घेऊन जनतेपुढे जात आहोत असे सांगत आपल्याकडे नीती, नियत आणि निधी असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीसांनी सुचकपणे भाष्य केलं आहे.

लाडक्या बहिणींनो आणि लाडक्या भावांनो असं म्हणत देवेंद्र फडणवीसांनी यावेळी




भाषणाला सुरुवात केली. सर्वधर्म आणि संस्कृतींचा भद्रावती येथे संगम आहे. या मतदारसंघात सरकारने मोठा पैसा दिलाय. मी कोणावरही टीका करत नाही, आम्ही विकासाचा मॉडेल घेऊन आलोय, आमच्याकडे नीती आहे, नियती आहे आणि निधी देखील आहे. छोट्या शहरांमध्ये जर आपण निधी दिला तर आपण या शहरांचा चेहरा बदलू शकतो. शहरामध्ये संधी असल्यामुळे गावातले लोक शहराकडे जातात. पण नियोजन नसल्यामुळे शहरांची अवस्था बिकट झालीय. मोदीजींनी पहिल्यांदा देशातल्या शहरांसाठी विविध योजना सुरू केला, त्या योजनांच्या माध्यमातून लाखो कोटी रुपये शहरांच्या विकासासाठी मोदीजींनी दिलेत. शहरातील घरांचे पट्टे आम्ही देणार आहोत, म्हणजे त्यांचा विकास करता येईल.

## पुन्हा १ महिन्याची मुदतवाढ! नागरिकांना दिलासा उच्च सुरक्षा पाटी ३१ डिसेंबरपर्यंत बसविणे बंधनकारक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९पुणे**

राज्य परिवहन विभागाने 'उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी' (एचएसआरपी) २०१९ च्या पूर्वीच्या वाहनांना बसविण्यासाठी पुन्हा एक महिन्याची मुदतवाढ दिली आहे. आता वाहनचालकांना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत नंबरप्लेट बसविणे बंधनकारक असून, या मुदतवाढीमुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. आता ही मुदतवाढ अंतिम असून, एचएसआरपी नंबरप्लेट नसलेल्या वाहनांवर वायुवेग पथकाकडून कारवाई करण्यात येणार असल्याचे राज्याच्या परिवहन आयुक्तांकडून सांगण्यात आले.




राज्यात २०१९ च्या पूर्वीच्या सर्व वाहनांना एचएसआरपी बसविणे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बंधनकारक आहे. त्यामुळे पुण्यात २५ लाखांपेक्षा जास्त वाहनांना ही नंबरप्लेट बसवावी लागणार आहे. मात्र, आतापर्यंत केवळ साडेसात लाख वाहनांना ही नंबरप्लेट बसविण्यात आली आहे. नंबरप्लेट बसविण्याचे काम एका कंपनीला देण्यात आले असून, वाहनसंख्या आणि त्या तुलनेत एचएसआरपी नंबर प्लेटची नोंदणी करून ती बसविण्यासाठी लागणारा कालावधी अधिक जात आहे. त्यामुळे एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याला मुदतवाढ मिळावी याबाबत सर्व स्तरांतून मागणी होत होती. त्यानुसार एक महिन्याची मुदतवाढ दिल्याची माहिती परिवहन आयुक्तांकडून देण्यात आली.

## बावनकुळे संतापले, म्हणाले नाना पटोलेंनी माझ्या बापाचा उल्लेख केला, त्यांची तीच पातळी....

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ नागपूर**

काँग्रेस नेते नाना पटोले यांनी माझ्या बापाचा उल्लेख केला. त्यांनी पातळी सोडूनच राजकारण केलं आहे,तसे केल्याने जर पटोले निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न करत असतील तर तो त्यांना महागात पडणार आहे , असे भाजप नेते व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. माध्यमांशी ते बोलत होते.विरोधक हे घाबरलेले आहेत, त्यांना काँग्रेसचे जहाज बुडताना दिसत आहे, हर्षवर्धन सपकाळ वाईट बोलत आहेत इकडे नाना पटोले वाईट बोलायला लागले, वडेट्टीवार यांनी पातळी सोडली आहे असे बावनकुळे म्हणाले. शेवटी जनतेने विधानसभेच्या निवडणुकीत जागा दाखवली, आताही लोक त्यांना जागा दाखवतील असे बावनकुळे म्हणाले.



मित्र पक्षाला निवडणूक लढण्याचा अधिकार आहे आणि शिंदेजी लढत आहेत,आम्ही मैत्रीपूर्ण लढत आहोत आमचं ठरलं होतं की जिथे मैत्रीपूर्ण लढत आहे तिथे कुठलाही मनभेद आणि मतभेद होणार नाही , असे बावनकुळे म्हणाले. मताचे विभाजनाची फार काळजी करायचं नसते, शेवटी मताचे विभाजन होईल की काय होईल, मला विश्वास आहे की भारतीय जनता पार्टी आणि आमची महायुती बहुमताने निवडून येईल, असे बावनकुळे म्हणाले.

## धनंजय मुंडेंना अटक करून सहआरोपी करा

### जरांगेंची संतोष देशमुख प्रकरणात मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९जालना**

संतोष देशमुख हत्या प्रकरणी आणखी सर्व आरोपींना अटकच झालेली नाही.मला तरी असे वाटते की धनंजय मुंडे यांना सहआरोपी करत



अटक केल्याशिवाय चार्ज फेम फडणवीस साहेब करत नाही असे वाटते, मुंडेंना अटक करतील अशी आम्ही आशा बाळगतो, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की,संतोष देशमुख यांचा खून करणाऱ्या आरोपीची धनंजय मुंडेंना आठवण येते, केवळ मतांसाठी ते भर सभेत आरोपीची आठवण काढतात. याचा अर्थ धनंजय मुंडे आणि आरोपी एकच आहेत. देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांनी मुंडेंना सहआरोपी केले पाहिजे. धनंजय मुंडेंना सहआरोपी करत अटक केली तर संतोष देशमुख यांना न्याय मिळेल नसता फडणवीस हेच आरोपी सोडून देत आहेत असा त्याचा अर्थ होईल. अजित पवार तर आरोपीमध्ये मिक्सच आहेत असे जरांगे यांनी म्हटले आहे.

## संपादकीय ......

# वाळूचे कण पळविता कारवाईचा बडगा पडे

राज्यात वाळू तस्करी हा गेल्या अनेक वर्षांपासून शासन आणि प्रशासन यांच्यासमोर उभा असलेला गंभीर प्रश्न आहे. बांधकाम क्षेत्राचा प्रचंड विस्तार, रस्ते आणि पायाभूत सुविधा उभारणीचे व्यापक कामकाज, तसेच नैसर्गिक संसाधनांवरील वाढता दबाव या सर्व गोष्टींमुळे वाळूला अचानक असामान्य व्यावसायिक मूल्य प्राप्त झाले. या मूल्यामुळे वाळू उत्खननात गुंतलेल्या परवानाधारक व्यावसायिकांसोबतच अवैध मार्गाने मोठ्या प्रमाणावर उत्खनन करणार्या टोळ्यांचा उदय झाला. नदीपात्रे रिकामी करत वेगाने पैसा मिळवण्याच्या स्पर्धेत गुन्हेगारी जाळे निर्माण होत गेले आणि शासनाचा महसूल, पर्यावरणीय समतोल आणि कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर परिणाम होऊ लागले. अशा पार्श्वभूमीवर राज्य सरकारने वाळू तस्करी रोखण्यासाठी कठोर उपाययोजना स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील महसूल विभागाने जारी केलेल्या नव्या परिपत्रकानुसार अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरले जाणारे वाहन पहिल्यांदा आढळल्यास त्याचा परवाना तीस दिवसांसाठी निलंबित ठेवण्यात येणार असून वाहन जप्त करण्यात येईल. दुसर्या गुन्ह्यात साठ दिवसांची निलंबनाची कारवाई होईल, तर तिसर्या गुन्ह्यात परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद आहे. हे पाऊल वरवर पाहता कठोर वाटत असले तरी त्याची मुळं राज्यातील वाढत्या अवैध खनिज तस्करीच्या खोल वास्तवात आहेत. एकीकडे शासनाला महसुलाचे मोठे नुकसान होत होते, तर दुसरीकडे नैसर्गिक स्त्रोतांची अक्षरशः लूट सुरू होती.

नदीपात्र खोल झाल्याने भूजलपातळीवर झालेला परिणाम, जलस्रोतांच्या मार्गक्रमणात झालेला बदल, नदीकाठची झाडे आणि जैवविविधता यांचे झालेले नुकसान यामुळे पर्यावरणाची हानी अटळ झाली होती. अवैध खनिज उत्खनन रोखण्याचा प्रयत्न करणार्या अधिकार्यांवर झालेल्या हल्ल्यांनी स्थिती अधिकच गंभीर बनवली. शासनाच्या कायद्याला सरळसरळ आव्हान देणारी ही परिस्थिती थांबवण्यासाठी ठोस पावले आवश्यक होती. या निर्णयाचे सकारात्मक परिणाम अनेक पातळ्यांवर दिसू शकतात. सर्वप्रथम, कठोर दंडात्मक कारवाईची तरतूद ही स्वतःच प्रतिबंधात्मक प्रभाव निर्माण करते. वाहनाचा परवाना निलंबित होणं म्हणजे त्या वाहनाच्या मालकासाठी आणि ऑपरेटरसाठी मोठा आर्थिक तोटा. बांधकाम किंवा वाहतूक क्षेत्रातील वाहन दिवसेंदिवस रेंगाळले की उत्पन्नाचे सर्व मार्ग थांबतात. त्यामुळे तस्करी करणार्यांच्या मनात कायद्याबद्दल भीती निर्माण होण्याची शक्यता वाढते. दुसरे म्हणजे, महसूल वाढीसाठी अशा कारवाईचा थेट उपयोग होतो. अवैध वाळू उत्खननामुळे शासनाच्या खजिन्यात जाणारे कोट्यवधी रुपये गळतीत निघून जात होते. वैध परवानाधारक व्यावसायिकांचीही आर्थिक स्पर्धा बिघडत होती. अवैध उत्खननावर लगाम बसल्यास परवाना घेऊन निर्धारित मर्यादेत काम करणार्यांचा व्यवसाय सुरक्षित होईल आणि शासनाच्या महसुलातही वाढ होईल. तिसरा आणि सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे पर्यावरण संरक्षण. नदीपात्रातून अतिरेकाने वाळू काढली गेल्यास नदीचे नैसर्गिक वहनप्रवाह बदलतात. पूरकाळात पाण्याचा मोकळा मार्ग मिळत नसल्यास दोन्ही बाजूंना होणारी गाळसाचणी वाढते. यामुळे पाणलोट क्षेत्रातील पर्यावरणीय साखळी बिघडते. या साखळीवर कृषी, मत्स्यव्यवसाय, स्थानिक पाणीपुरवठा व्यवस्था आणि भूजल यांचे संतुलन अवलंबून असते.

अवैध उत्खननाला चाप बसला तर संपूर्ण परिसंस्था सुरक्षित होईल. सरकारचा हा निर्णय एक पर्यावरणपूरक पाऊल म्हणून निश्चितच स्वागतार्ह आहे, मात्र अशा कठोर धोरणाची अंमलबजावणी करताना अनेक अडचणी उद्भवू शकतात. सर्वप्रथम, वाळू तस्करीच्या विरोधात उभ्या राहणार्या सरकारी कर्मचार्यांना सुरक्षा देण्याची आवश्यकता आहे. पूर्वी अनेक अधिकारी आणि कर्मचारी अवैध वाहतुकीची माहिती गोळा करताना किंवा कारवाई करताना मारहाण, दगडफेक, धमक्या किंवा जीवावर बेतलेले प्रसंग यांना सामोरे गेले आहेत. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या गटांचा आर्थिक फायदा मोठा असल्याने ते प्रतिकार करतात. अशावेळी कायद्याची भीती आणि प्रशासनाचा अधिकार वास्तविकतेत कार्यान्वित करण्यासाठी पोलीस, महसूल आणि परिवहन विभागांमध्ये समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे. तसेच अवैध उत्खनन आणि वाहतूक हे अनेकदा रात्रीच्या अंधारात, दुर्गम भागात किंवा नदीपात्राच्या अनोख्या मार्गाने केले जाते. वाहनांच्या नंबर प्लेट बदलणे, मार्ग बदलणे, नदीतून थेट भार बाहेर काढणे किंवा मोटारीकृत बोटींचा वापर अशा पद्धतींचा वापर करून गुन्हेगार प्रशासनाला चकवा देतात. त्यामुळे तांत्रिक साधनांची आवश्यकता भासते. ड्रोन सर्व्हेलन्स, जीपीएस ट्रॅकिंग, लायसन्स नंबर व्हेरिफिकेशन सिस्टिम, सीसीटीव्ही नेटवर्क यासारख्या तंत्रज्ञानाचा विस्तार न झाल्यास कारवाईची खात्री कमी राहते. तिसरी अडचण म्हणजे भ्रष्टाचाराचे सावट. कोणत्याही कठोर धोरणाच्या यशात प्रशासनातील प्रामाणिकपणा महत्त्वाचा असतो. काही ठिकाणी स्थानिक पातळीवर भ्रष्ट आघाड्या तयार होतात ज्या अवैध उत्खननाला संरक्षण देतात. अशा वेळी धोरण कितीही कठोर असले तरी त्याची अंमलबजावणी कागदापुरतीच राहते. त्यामुळे पारदर्शी आणि जबाबदार यंत्रणा उभारणे हीदेखील मोठी गरज आहे. यासाठी प्रशासनातील तीन प्रमुख विभाग म्हणजे महसूल, पोलीस आणि परिवहन यांच्यात तात्काळ माहिती विनिमयाची एकात्मिक डिजिटल प्रणाली तयार करणे आवश्यक आहे. एखादे वाहन वाळू वाहतुकीत अडकले आहे याची माहिती महसूल विभागाने लगेच परिवहन खात्याला कळवणे ही तरतूद आता परिपत्रकात आहेच, परंतु ही माहिती रिअल-टाइममध्ये डिजिटल स्वरूपात दोन मिनिटांत पोहोचणे अधिक उपयुक्त ठरेल. अशा वेळी वाहन तपासणी पथकांना जागेवरच कारवाई करण्याचा अधिकार आणि साधने मिळू शकतात.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'सर्वोच्च दिलासा'

## निवडणूक रद्द करण्याची याचिका फेटाळली



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९नागपूर**

ुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवडणुकीस आव्हान देणार्या काँग्रेसचे उमेदवार प्रफुल्ल गुडधे यांना 'सर्वोच्च' झटका बसला आहे. सर्वोच्च न्यायालयानं शुक्रवारी त्यांची याचिका फेटाळून लावली आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीला आव्हान देणारी प्रफुल्ल गुडधे यांची याचिका न्या. जे. के. माहेश्वरी आणि न्या. विजय बिष्णोई यांच्या खंडपीठानं आज फेटाळली. यापूर्वी प्रफुल्ल गुडधे यांनी उच्च न्यायालयात सुद्धा याचिका केली होती, ती उच्च न्यायालयानं सुद्धा फेटाळली होती.

### प्रफुल्ल गुडधे यांना सर्वोच्च झटका

: विधानसभा निवडणुका ईव्हीएमवर घेतल्यानं देवेंद्र फडणवीस यांची निवडणूक रद्द करण्याची मागणी गुडधे यांनी या याचिकेतून केली होती. यापूर्वी सुद्धा प्रफुल्ल गुडधे यांनी अनेकदा देवेंद्र फडणवीसांच्या निवडणुकीला आव्हान दिले. पण, प्रत्येकवेळी त्यांना तिथंही पराभवच स्वीकारावा लागला आहे. आज पुन्हा त्यांना सर्वोच्च झटका बसला आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला काँग्रेसचे प्रफुल्ल गुडधे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभा निवडणुकीतील विजयास आवाहन देणारी एक याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. निवडणुकीत प्रक्रियात्मक त्रुटी व भ्रष्ट पद्धतींचा वापर केल्याचा निवडणूक याचिकेत दावा केला होता. ही याचिका फेटाळल्याने प्रफुल्ल गुडधे यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका केली होती. परंतु, सर्वोच्च न्यायालयानं देखील याचिका फेटाळल्यानं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलासा मिळाला आहे.

देवेंद्र फडणवीस आणि प्रफुल्ल गुडधे यांनी यापूर्वी दोनवेळा विधानसभेची निवडणूक एकमेकांच्या विरोधात लढवली आहे. विधानसभेत गुडधे यांना दक्षिण-पश्चिम नागपूर कधीच विजय मिळवता आला नाही. तर त्याचप्रमाणं भाजपाला महापालिकेच्या निवडणुकीत गुडधे यांना पराभूत करता आलं नाही. गुडधे नागपूर महापालिकेत काँग्रेसचे गटनेते होते. अभ्यासू नगरसेवक आणि देवेंद्र फडणवीस यांचे कट्टर विरोधक अशी त्यांची ओळख आहे.




# पोटभर भात खाऊनही वजन, शुगर किंचितही वाढणार नाही! न्यूट्रिशनिस्ट सांगतात भात खाण्याच्या ट्रिक्स...

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक**

भाताचा ग्लायसेमिक इंडेक्स (ऋख) कमी करून खा :- ज्यांना भात खाणे खूप आवडते आणि त्यांना तो त्यांच्या आहारात आरोग्यपूर्ण पद्धतीने समाविष्ट करायचा आहे, त्यांच्यासाठी एक सोपी युक्ती आहे, जी फॉलो करून आपण भात हेल्दी पद्धतीने खाऊ शकतात. न्यूट्रिशनिस्ट नेहा सिन्हा यांनी सांगितले की, भाताचा ग्लायसेमिक इंडेक्स (ऋख) कमी करून खाल्ल्यास तुम्ही निरोगी राहाल, भात खाऊन तुमचे वजन लवकर वाढणार नाही आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहील. शिजवलेला भात रात्रभर फ्रीजमध्ये ठेवा आणि सकाळी हा भात गरम करून खा. ब्राऊन राइसमध्येही सफेद भाताप्रमाणे स्टार्च तयार होतो, ज्याला फ्रीजमध्ये ठेवून कमी केले जाऊ शकते. भातामध्ये असलेला स्टार्च सहज पचत नाही, म्हणून तो कमी करणे आवश्यक आहे. फ्रीजमध्ये ठेवल्याने स्टार्चचे रूपांतर 'रेझिस्टंट स्टार्च'मध्ये होते, ज्यामुळे भाताचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी होतो.

ब्राऊन राइसचा ग्लायसेमिक इंडेक्स (ऋख) कमी असतो, जो मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर असतो. सफेद भाताऐवजी ब्राऊन राइसला आहारात समाविष्ट करा. न्यूट्रिशनिस्ट नेहा सिन्हा यांनी सांगितले की, ब्राऊन राइस आतड्यांच्या आरोग्यासाठी देखील फायदेशीर असतो. ब्राऊन राइस खाल्ल्याने पोषक तत्वे अधिक चांगल्या प्रकारे शोषली जातात. ब्राऊन राइसमध्ये मॅग्नेशियम आणि अँटी-ऑक्सिडंट्स असतात, जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर पोषक तत्व मानले जातात. यात असलेल्या फायबरमुळे बॅड



कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत मिळते.

भातासोबत फायबरयुक्त भाज्या खाव्यात :- फक्त भात खाण्याऐवजी, जेवणाच्या ताटात फायबरयुक्त ताज्या भाज्यांचा देखील समावेश करावा. यामुळे शरीरातील फायबरची कमतरता दूर होण्यास मदत होईल.

रोजच्या जेवणाच्या ताटात भातासोबतच पुरेशा प्रमाणांत प्रोटीनचा देखील समावेश करा. प्रोटीनसाठी आपण टोफू किंवा पनीर खाऊ शकता. यामुळे पोट जास्त वेळ भरलेले राहील आणि लवकर भूक लागणार नाही. रक्तातील साखर वाढणे कमी करण्यासाठी प्रोटीनयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करणे फायदेशीर ठरते.

भातासोबत सॅलॅड खा :- भातासोबत तुमच्या ताटात सॅलॅडचा समावेश करा. सॅलॅड खाल्ल्याने शरीराला ऊर्जा मिळते. उत्तम पचनासाठी भातासोबत सॅलॅड खाणे फायदेशीर ठरते.

# शेतात ड्रोन उडवण्यासाठी आता परवानगीची गरज नाही; केंद्र सरकारने 'हा' नियम केला शिथिल

**दि.२८ विदर्भ प्रजासत्ताक**

कृषी क्षेत्रात ड्रोनचा वापर वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर ड्रोन उडविण्याचे नियम आता काही प्रमाणात शिथिल करण्यात आले आहेत.

केंद्र सरकारच्या नव्या नियमांनुसार आता ४०० मीटर उंचीपर्यंत ड्रोन उडविण्यासाठी शासनाच्या परवानगीची गरज असणार नाही. हि सवलत मिळण्यापूर्वी शेतात ड्रोन उडविण्यासंदर्भात कायदेशीर अडचणींचा सामना शेतकऱ्यांना करावा लागत होता. केंद्र सरकारने कृषी क्षेत्रात ड्रोनच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी पावले उचलली आहेत. आता शेतीसाठी वापराच्या उद्देशाने ४०० मीटर उंचीपर्यंत ड्रोन उडवण्यास परवानगीची आवश्यकता नसेल. हा ग्रीन झोन निश्चित केला असून, तेथे विनापरवाना ड्रोन उडवता येईल.




### ड्रोन खरेदीसाठी दहा लाखांपर्यंत अनुदान

सरकारी कृषी संस्थांसाठी ड्रोन खरेदीवर १०० टक्के किंवा १० लाखांपर्यंतचे अनुदान मिळणार आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांना साडेसात लाख रुपयांपर्यंत अनुदान मिळणार आहे.

कृषी पदवीधरांना पाच लाखांपर्यंत अनुदान असेल.

जिल्हा परिषदही मदतीला

जिल्हा परिषदेसह कृषी विभागाकडेही आर्थिक तरतुदी करण्यात येत आहेत.

सांगली जिल्हा परिषदेने ड्रोनचे प्रशिक्षण, ड्रोनची खरेदी यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली आहे.

याअंतर्गत महिला बचत गटांना ड्रोनचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

हा ड्रोन प्रामुख्याने कृषी क्षेत्रासाठी भाडेतत्त्वावर वापरात आणला जाणार आहे.

मात्र ड्रोन उडविण्यावर बरेच शासकीय निर्बंध असल्याने अडचणी येत होत्या.

हे लक्षात घेऊन केंद्र सरकारने नुकतेच ड्रोन उडवण्यावरील निर्बंध शिथिल केले आहेत.

# झेडपी आरोग्य विभागातील ३२ कर्मचाऱ्यांना मिळणार बढती

## प्रक्रिया पूर्ण, आदेशाची प्रतिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती**- जिल्हा परिषद आरोग्य विभागातील आरोग्य सेवक महिला, पुरूष व आरोग्य साहाय्यक महिला, पुरूष या संवर्गातील ३२ कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळणार आहे. याबाबतची प्रक्रिया पार पडली असून केवळ स्वाक्षरी करिता वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या टेबल फाईल पडून आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना आता पदोन्नतीचा प्रतिक्षा लागली आहे. शासनाच्या आदेशावरुन आता सर्वच विभागांमध्ये पात्रकर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीची प्रक्रिया राबविली जात आहे. आरोग्य विभागामध्ये देखील ३२ कर्मचारी पदोन्नतीकरिता पात्र असून त्यांची सर्व प्रक्रिया पार पडली आहे. आरोग्यसेवक व महिला पुरूषांना आरोग्य,साहाय्यक पदी पदोन्नती मिळणार आहे. आणि आरोग्य साहाय्यकांना पर्यवेक्षक म्हणून बढती मिळेल. आरोग्य सेवक महिलांमध्ये १३ व पूरूषांमध्ये १४ कर्मचारी पदोन्नतीकरिता पात्र आहे.



तसेच महीला आरोग्य साहाय्यकां मध्ये ४ व पुरूष साहाय्यकांमध्ये एक असे ३२ कर्मचारी पदोन्नतीकरिता पात्र असून त्यांची फाईत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आली आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना थेट आदेश मिळतो की त्यांचे समुपदेशन प्रक्रियाराबविण्यात येणार आहे.

# धान, भरडधान्य खरेदी नोंदणीच्या मुदतीत १५ डिसेंबरपर्यंत वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि२९अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने खरीप पणन हंगाम २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत धान आणि भरडधान्य विक्रीसाठी शेतकरी नोंदणीच्या मुदतीत वाढ करण्यात आली असूनही मुदत वाढवून आता १५ डिसेंबर २०२५ केली आहे.ज्या शेतकऱ्यांची नोंदणी अद्याप झालेली नव्हती, त्यांना आता आधारभूत किंमत खरेदी योजनेचा लाभ घेण्यासाठी आणखी १५ दिवसांचा वेळ मिळाला आहे. शेतकऱ्यांनी या वाढीव मुदतीचा फायदा घेऊन आपली नोंदणी लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहन अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे उपसचिव राजश्री सारंग यांनी केले आहे.

# हरभऱ्याची हिरवी भाजी खा, रोगप्रतिकारशक्ती वाढवा !



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती-**

थंडीच्या दिवसांत हरभऱ्याच्या पानांची भाजी खाणे आरोग्यासाठी अतिशय लाभदायक असते. सद्यस्थितीत बाजारात हिवाळ्यातील हरभऱ्याची भाजी विक्रीस येऊ लागली आहे. विशेषता थंडीतच ही भाजी उपलब्ध होते. हरभरा भाजीत कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, पोटॅशिअम, फॉस्फरस, आयर्न, झिंक, मैगनीज, कॉपर अधिक प्रमाणात असल्याने तिच्या सेवनाने रोगप्रतिकारशक्ती वाढते.

हरभऱ्याच्या पानांची भाजी चवीला अतिशय स्वादिष्ट असते. या भाजीत डायटरी फायबर अधिक असल्याने मानवी शरीरातील साखरेची पातळी नियंत्रित राहते. मधुमेह टाळण्यास मदत होते. या भाजीत असलेल्या खनिजामुळे आरोग्याच्या विविध तक्रारींवर मात करता येते. जिल्ह्यात रब्बी हंगामात सर्वाधिक हरभरा पिकाची लागवड होते.

सद्यस्थितीत या पिकाची लागवड झाली असून, हरभऱ्याचे

## मधुमेहाच्या रुग्णांसाठी फायदेशीर, साखरही नियंत्रित

पीक जोमाने वाढत आहे. कडाक्याची थंडी हरभऱ्यासाठी पोषक मानली जाते. जेवढी बंडी अधिक तेवढे पीक चांगले वाढते. हरभऱ्याची हिरवी भाजी खाल्ल्याने कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहते. ही भाजी मुगाच्या डाळीसोबत तयार केल्यास कुणाला भाजीमुळे पित्त होत असेल तर पित्त होणार नाही, असे तज्ज्ञ डॉक्टर सांगतात

### हरभरा भाजीचे हे आहेत फायदे

हरभ-याच्या हिरव्या भाजीचे सेवन केल्याने कोलेस्टेरॉल नियंत्रित राहते, जे हृदयाच्या आजाराचा बचाव करते. यामध्ये अधिक प्रमाणात पोटॅशिअम असल्याने रक्तदाब नियंत्रणात राहतो. तसेच कॉपर आणि झिंकमुळे त्वचेची चमक वाढते. भाजीतील आयर्न हे रक्ताच्या कमतरतेपासून बचाव करते. तसेच मधुमेहापासून ते त्वचेच्या अनेक समस्यांपासून सुटका मिळविण्यासाठी भाजी खूप फायदेशीर ठरते.हरभऱ्याच्या हिरव्या भाजीत अधिक प्रमाणात खनिज आणि अँटिऑक्सिडंट असतात. यामुळे अनेक आरोग्याच्या तक्रारींवर मात करता येते. भाजीत डाएटरी फायबर जास्त असल्याने शरीरातील शुगर नियंत्रणात असते. मधुमेहात फायदा होतो.

(आयुर्वेद तज्ञ)

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २९ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण



# ओव्हरलोडेड डीपीमुळे शेतकऱ्यांचे रब्बीचे पिकही धोक्यात

## १५ गावातील शेतकऱ्यांनी तिवसा येथील उपकार्यकारी अभियंत्याना दिले निवेदन

### जुन्या डीपी शेजारी किंवा त्याच ठिकाणी नविन डिपी बसवण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९तिवसा:** तिवसा तालुक्यातील वऱ्हा,माळेगांव, अनकवाडी, मालधूर, रघुनाथपुर, धोत्रा, सालोरा, शेंदोशा बु, शिवनगांव, फत्तेपुर, शिरजगांव मोझरी, शेंदोळा खुर्द, मोझरी व गुरूदेवनगर आणि मार्डी अशा १५ गावातील शेतकऱ्यांनी शुक्रवारी महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीच्या उपकार्यकारी अभियंता कार्यालयात धडक दिली. यावेळी जुन्या डीपीवर लोड येऊन डीपी नादुरुस्त होत असल्यामुळे रब्बीच्या पिकांचे ओलीत ठप्प झाले आहे.आधीच अतिवृष्टीच्या संकटामुळे खरीपाचे पिक खराब झाले आहे. शासनाची मदत सुद्धा अद्याप मिळाली नाही. घरातील सोन, चांदी किंवा किंमती वस्तु आणि धान्य विकून रब्बीची पिक पेरणी केली आहे, अशा परिस्थितीत आता डिपीच्या लपंडावामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. परिणामी गहू, हरभरा पिकांचे नुकसान होत असल्याने एकतर जुन्या डीपी शेजारी नवीन डीपी बसवून देण्यात यावे किंवा नवीन डीपी बसवण्याची मागणी उपकार्यकारी अभियंता यांच्या मार्फत सामाजिक कार्यकर्ता प्रशांत कांबळे यांच्या नेतृत्वात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे.शेतकऱ्यांच्या ओलीत ठप्प झाले आहे.या मौजामधील कृषी डिपीवर लोड वाढत असल्याने शेतकऱ्यांना दररोज त्रास सहन करावा लागतो आहे. सर्व डिपी आणि कृषी लाईन जुन्या झाल्या आहे. झाडांची कटिंग होत नसल्याने कृषी विद्युत लाईन अनेक वेळा बंद पडत आहे.आधीच अतिवृष्टीच्या संकटामुळे खरीपाचे पिक खराब झाले आहे. शासनाची मदत सुद्धा अद्याप मिळाली नाही. घरातील सोन, चांदी किंवा किंमती वस्तु आणि धान्य विकून रब्बीची पिक पेरणी केली आहे, अशा परिस्थितीत आता डिपीच्या लपंडावामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे.

जुन्या सर्व डिपी ऐवजी नविन डिपी किंवा त्याच ठिकाणी अतिरिक्त नविन डिपी बसवून द्यावी.डिपी वरील जुनी लाईन कनेक्शन, पोल नव्याने बसवण्यात यावे.मौजा निहाय कृषी पंपाच्या विजेच्या लाईन झाडांमध्ये अडकल्याने तातडीने ट्रि कटिंग करावे या मागणीचे निवेदन उपकार्यकारी अभियंता यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कृषिमंत्र्यांकडे केली आहे. या मागणीचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले. यावेळी स्वप्नील तुरकाने, देवेंद्र घाटोळ, प्रकाश चिचखेडे, मालधुरचे सरपंच सूरज धूमनखेडे, धोत्राचे सरपंच भूषण गाठे, जसबीर ठाकुर, मुकुंद चिंचे, रवींद्र मांडवलकर, अतुल उमप, चेतन टाले, आकाश पोजगे, स्वप्नील इंगोले, अनंत केचे, निलेश मदणकर, सुरज उमप, अनिल भस्मे, स्वप्नील तुरकाने, प्रकाश चिंचखेडे, राहुल येरणे, आशिष बायस्कर, सुरेंद्र वाघने, मनोहर वाढोनकर, पंकज देवळे, श्याम बेले, विजय कुरळकर, मधुकर माहुरे यांची उपस्थिती होती.

अस्मानी संकटाने आधीच शेतकऱ्यांच्या तोंडी आलेला घास हिसकावून घेतला आहे. सध्या शेतकऱ्यांनी उसणवारी आणि सोने-नाणे आणि घरातील शिल्लक धान्य विकून रब्बीची पेरणी केली आहे. अशा परिस्थितीत जर शेतकऱ्यांच्या ओलीत होत नसेल तर शेतकरी पुन्हा संकटात सापडणार आहे. त्यामुळे ओव्हरलोड डीपी झालेल्या ठिकाणी नवीन अतिरिक्त किंवा नवीन डीपी देण्यात यावी.- **प्रशांत कांबळे,** शिरजगाव मोझरी.

#### डीपीडीसी मधून पाहिजे तसा निधी मिळत नाही

. यापूर्वी ४ कोटींची मागणी केली होती. मात्र फक्त ८० लाख रुपये मिळाले आहे. त्यामुळे आधीच अनेक प्रस्तावित कामे प्रलंबित आहे. त्यानंतर शेतकऱ्यांच्या या मागणीवरून पुन्हा नव्याने डीपीआर तयार करून शासनाकडे पाठवण्यात येणार आहे. जेणे करून शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या समस्या दूर होईल.- **निलेश उईके,** उपकार्यकारी अभियंता, तिवसा-

#### सोलर कनेक्शन येवजी ईजीचे कनेक्शन द्यावे

राज्य सरकारने सध्या ईजी चे नवीन कनेक्शन बंद करून सोलर कनेक्शन देण्याची योजना सुरू केली आहे. परिणामी सोलर कनेक्शन घेऊनही शेतकऱ्यांचे पाहिजे तसे ओलीत होत नाही. शिवाय मोटार चालत नाही. त्यामुळे सोलर कनेक्शन सरासरी बंधनकारक अशी अट रद्द करून ईजीचे कनेक्शन देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

---

# पालकमंत्री बावनकुळेंच्या वक्तव्याने अमरावतीत चर्चांना उधाण

## पोटेंची विधान परिषद शक्यता मजबूत



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती-** अमरावतीतील एका जाहीर सभेत महसूलमंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माजी मंत्री प्रवीण पोटे-पाटील यांना विधान परिषदेच्या उमेदवारीचे संकेत दिले. काळजी करू नका. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सांगितले आहे की, अमरावती जिल्ह्यात निवडून येणाऱ्या नगरसेवकांची मते प्रवीण पोटेंना द्यायची आहेत, असे सांगत त्यांनी पोटेंच्या पुनर्वसनाचे स्पष्ट संकेत दिले.खुल्या मंचावर प्रदेशाध्यक्षांचा संदेश देतानाच बाकीचे एकट्यात सांगेन असे म्हणत बावनकुळे यांनी वक्तव्याला विराम दिला. या सूचक विधानानंतर सभास्थळी हशा पिकला, तर दोघांच्या चर्चेनंतर आता तिसरा कोण? यावरही कुजबुज सुरू झाली. तसेच निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे पालन करण्याचे आवाहन करत त्यांनी संयम बाळगण्याचा सल्ला दिला.

# निवडणूक प्रचाराला २४ तासांची वाढ

## १ डिसेंबरच्या रात्री १० पर्यंत वाजणार भोंगे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती :** नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रचाराचा कालावधी अत्यल्प असल्याने उमेदवारांची दमछाक होत असतानाच राज्य निवडणूक आयोगाने दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. आयोगाच्या सुधारित तरतुदीनुसार आता जाहीर प्रचाराची मुदत २४ तासांनी वाढविण्यात आली असून उमेदवारांना १ डिसेंबरच्या रात्री १० वाजेपर्यंत प्रचार करता येणार आहे. गुरुवारी उशिरा आयोगाने ही अधिसूचना जारी केली.

निवडणूक चिन्हांचे वाटप २६ नोव्हेंबरला झाले होते. त्यानंतर केवळ चार दिवसांत प्रचाराचा कालावधी संपत होता. पूर्वीच्या तरतुदीनुसार ३० नोव्हेंबरच्या मध्यरात्री १२ वाजता प्रचारबंदी लागू होणार होती. शिवाय रात्री १० नंतर सभा, ध्वनीक्षेपकाचा वापर तसेच जाहिरात-प्रसारण बंद असल्याने उमेदवारांना अल्प वेळेत जनसंपर्क आटोपण्याचा



मोठा ताण जाणवत होता. मात्र सुधारित आदेशानंतर अखेरच्या दिवशी उमेदवारांना अतिरिक्त संधी मिळणार असून १ डिसेंबरचा दिवस ‘सुपर मंडे’ ठरणार आहे.


१ डिसेंबरला पदयात्रा, रॅली, सभा यांना मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. भोंगे रात्री १० पर्यंत सुरू राहू शकतात, त्यामुळे गल्लीबोळांत प्रचाराची जोरदार रंगत दिसणार आहे. जिल्ह्यातील १० नगरपरिषद व २ नगरपंचायतींमध्ये मतदानाच्या आदल्या दिवशी निवडणुकीचा ताप चांगलाच चढणार आहे.

२ डिसेंबरला सकाळी ७.३० वाजता मतदान सुरू होईल. मतदान सुरू होण्याच्या ९.३० तास आधीपर्यंत प्रचारास परवानगी देण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. सहआयुक्त डॉ. विकास खंडारे यांनी स्पष्ट केले की, १ डिसेंबरच्या रात्री १० नंतर जाहीर प्रचाराला पूर्णपणे बंदी असेल.प्रचाराच्या शेवटच्या दिवशी आचारसंहिता उल्लंघनाच्या घटना वाढण्याची शक्यता असून प्रलोभन, दबाव किंवा मतदारांवर परिणाम करणारी कोणतीही कृती आढळल्यास तातडीची कारवाई होणार असल्याचे प्रशासनाने सूचित केले आहे.

---

# उद्याला आरोग्य, आनंद आणि उत्साहाचा मेळा

## हॅपी स्ट्रीट्स उपक्रम नागरिकांसाठी रविवार ठरणार 'फनडे' रोड दोन तासांसाठी वाहतुकीपासून मुक्त



**विदर्भ प्रजासत्ताकदि.२९अमरावती** शहरातील नागरिकांच्या दैनंदिन धकाधकीत जिवनात त्यांचे आरोग्य, तंदुरुस्ती आणि आनंदाची आवश्यकता घेऊन अमरावती महानगरपालिकेतर्फे हॅपी स्ट्रीट्स हा उपक्रम मोर्शी रोडवरील वेलकम पॉईंट परिसरात रविवार, ३० नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे ६ ते ८ या वेळेत होणार असून, नागरिकांना आपल्या कुटुंबीयांसह सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.झुंबा सत्र, लहान मुले आणि प्रौढांसाठी वेगवेगळे गेम्स, फिटनेस आधारित कृती, मनोरंजक क्रिडा उपक्रम, तसेच स्वच्छता आणि आरोग्यविषयक जनजागृतीचे अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. या निमित्ताने मोर्शी रोड दोन तासासाठी वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार असून, संपूर्ण परिसर खुल्या व्यायामशाळेत आणि मनोरंजनस्थळात परिवर्तित होणार आहे. सकाळच्या ताज्या हवेतील व्यायाम, नृत्य, खेळ आणि सामूहिक सहभागातून नागरिकांना तणावमुक्त वातावरणाचा अनुभव मिळणार आहे. शहरातील कुटुंबे, तरुण, ज्येष्ठ नागरिक आणि मुलांसाठी ही एकत्र वेळ घालवण्याची आणि आरोग्यपूर्ण उपक्रमांचा आनंद घेण्याची उत्तम संधी ठरणार आहे.अमरावती महापालिकेने नागरिकांना सकाळी वेळ काढून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले असून, हॅपी स्ट्रीट्समुळे शहरात सकारात्मकतेचा नवा उर्जावान माहोल निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# ‘जनआरोग्य’ मध्ये अक्कलदाढसह मुख शस्त्रक्रियाही मोफत होणार

## राज्य सरकारचा महत्त्वाचा निर्णय गोरगरीब रुग्णांना दिलासा, उपचार खर्च मर्यादेतही वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती** महाराष्ट्र शासनाने महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत सामान्य आणि गरीब रुग्णांसाठी एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या योजनेत आता मॅक्सिलोफेशियल 'ओरल ॲड सर्जरी' शल्यचिकित्साशास्त्र या विशेष शाखेचा समावेश करण्यात आला आहे.राज्य शासनाने घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे या योजनेंतर्गत अक्कलदाढ काढण्यापासून ते २२ नवीन दंत व मुख शस्त्रक्रियेसह मुख कर्करोगाशी संबंधित मुख उपचार मोफत मिळणार आहेत. यामुळे मुखाशी संबंधित गंभीर आजारांवर उपचार घेऊ न शकणाऱ्या राज्यातील



लाखो गोरगरीब रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.उपचारांच्या खर्चाची मर्यादाही वाढवण्यात आली आहे. पूर्वी ही मर्यादा १.५ लाख रुपये (प्रतिकुटुंब प्रतिवर्ष) होती. आता ती वाढवून ५ लाख केली.या निर्णयामुळे महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत आता एकूण २२ नवीन दंत व मुख शस्त्रक्रिया मोफत उपलब्ध होणार आहेत. यात अक्कलदाढेवरील शस्त्रक्रिया, जबड्याचे फॅक्चर, चेहऱ्यावरील हाडांचे फॅक्चर, ओरल सबम्युकस फायब्रोसिस, जबड्याचा सांधा जाम झाल्यास, जबड्याचा हाडांचा संसर्ग, जबडा किंवा तोंडाच्या संरचनेशी संबंधित मोठे उपचार, निघून गेलेला दात पुन्हा जागेवर बसविणे या उपचारांचा समावेश आहे.

#### आवश्यक कागदपत्रे

महात्मा फुले जन आरोग्य योजनेसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये रेशन कार्ड (पांढरे/केशरी/पिवळे), अंत्योदय अन्न योजना कार्ड (--ध) किंवा अन्नपूर्णा कार्ड यापैकी एक असणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, ओळख आणि पत्त्याचा पुरावा, आणि काही प्रकरणांमध्ये उत्पन्नाचा पुरावा सादर करावा लागू शकतो.

#### कसा घ्यायचा या योजनेचा लाभ ?

या योजनेचा लाभ केशरी, पिवळी शिधापत्रिकाधारक, तसेच अन्नपूर्णा व अंत्योदय कार्डधारक घेऊ शकतात. रुग्ण या योजनेत समाविष्ट असलेल्या कोणत्याही सरकारी किंवा खासगी रुग्णालयात जाऊन संबंधित उपचार मोफत मिळवू शकतात. रुग्णालयाच्या 'आरोग्यमित्र' कक्षात यासाठी विशेष मदत मिळते

---

# शेंदुर्जना बाजार परिसरात पुन्हा बिबट्याचे दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९तिवसा** तिवसा तालुक्यातील रघुनाथपूर, निंबोरा, क्षेत्रातील पंचक्रोशीत गेल्या महिनाभरात बिबट्याच्या हालचालीमध्ये सातत्याने वाढ होत असून एक आठवडयापूर्वीच बिबट्याचे या परिसरात दर्शन झाल्याने नागरिकांनमध्ये भीतीचे सावट पसरले होते.तो आज पुन्हा दुपारी दोन वाजताच्या सुमारास मौजा शेंदुर्जना बाजार, येथे पांदण रस्त्यावरील असलेल्या आनंदराव तिखे यांच्या शेतात तूर पिकावर फवारणी करत असताना अमोल गडलिंग यांना अचानक बीबट्याचे दर्शन झाले. या अनपेक्षित प्रसंगामुळे ते घाबरले व तात्काळ वन विभागाशी संपर्क साधलामाहिती मिळताच वनरक्षक जी. डी.जाभे, गजानन राऊत, त्वरित दाखल झाले यावेळी शेत परिसराची सपूर्ण पाहनी करून शोध मोहीम राबवली मात्र बिबट्याच्या पायाचे ठसे किंवा बिबट्याचा थांगपत्ता लागला नाही. यावेळी घटनास्थळी शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वनविभागाच्या वतीने शेतकरी व ग्रामस्थाना सतर्क राहण्याचे आवाहन वन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.गत एक आठवड्यापूर्वीच या भागात शेतात ट्रॅक्टरद्वारे नांगरणी करत असताना समोरासमोर काही अंतरावरच बिबट्या आढळला होता व आज दुपारी पुन्हा शेतात बिबट्याचे अचानक दर्शन झाल्याने हा परिसर बिबट्याच्या मुक्त वावरासाठी धोकादायक बनला आहे. दररोज शेतकरी व ग्रामस्थ शेतीच्या कामानिमित्त ये जा करत असतात त्यामुळे बिबट्याचे दर्शन झाल्याने शेतकरी व सामाण्यांमध्ये भीती पसरली आहे सदर घटनेची माहीती मिळताच वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिसरात गस्त वाढवून शोधमोहीम सुरू केली.



मौजा शेंदुर्जना बाजार परिसरातशेतात फवारणी चालू असताना शेतकरी अमोल गडलिंग, यांना अचानक बिबट्या दिसलयाची माहिती मिळाली त्वरित वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले, या परिसरात गस्त वाढवून शोध मोहीम सुरू केली.
**महादेव गवई,वनपाल तिवसा.**

# अतिरिक्त शिक्षक समायोजनाला तात्पुरती स्थगिती द्या

## चंद्रशेखर भोयर यांची मागणी : मुख्यमंत्री फडणवीस यांना दिले निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती** - सन २०२४-२५ च्या संच मान्यतेनुसार करण्यात येणाऱ्या अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेला आगामी सन २०२५-२६ च्या संच मान्यता जाहीर होईपर्यंत स्थगिती द्यावी, अशी मागणी शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सध्याच्या संच मान्यतेनुसार अनेक शाळांमध्ये विद्यार्थीसंख्या वाढलेली असून त्यानुसार शिक्षकांची गरजही प्रत्यक्षात अधिक आहे. मात्र जुन्या संच मान्यतेच्या आधारे अतिरिक्त शिक्षक घोषित होत असल्याने अनेक शिक्षकांना विनाकारण समायोजनाला सामोरे जावे लागत आहे. नव्या २०२५-२६ संच मान्यतेत विद्यार्थ्यांच्या अद्ययावत माहितीनुसार पदसंख्या निश्चित होणार असल्याने त्याआधी कोणतेही समायोजन होऊ नये, अशी भूमिका त्यांनी मांडली.शिक्षकांचे समायोजन ही अत्यंत संवेदनशील प्रक्रिया असून या



प्रक्रियेत येणाऱ्या बदलांमुळे शिक्षकांच्या सेवेत, कुटुंबीय स्थितीत तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सातत्यात अडथळे निर्माण होतात. शासनाने शिक्षकांच्याव्यावहारिक अडचणी आणि स्थैर्य विचारात घेऊनच निर्णय घ्यावा, अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित विभागाशी चर्चा करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती भोयर यांनी दिली.

# चित्रकला स्पर्धेत विजेत्यांना यंदा वाढीव पारितोषिकांची मेजवानी

## कला संचालनालयाच्या प्रस्तावाला उच्च तंत्रशिक्षणमंत्र्यांकडून मंजुरी; विद्यार्थ्यांना प्रोत्साहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती –** शालेय स्तरावर होणार्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षांमधील प्रथम क्रमांकाच्या बक्षिसात लक्षणीय वाढ झाली आहे. कला संचालनालयाच्या प्रस्तावाला उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी मंजुरी दिली आहे. त्यामुळे बक्षीस वाढीच्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळणार आहे.दरवर्षी शासकीय रेखाकला परीक्षेसाठी जिल्ह्यातून हजारो विद्यार्थी बसतात. यावर्षीपासून पारितोषिकांची रक्कम वाढवल्याने परीक्षेला बसणार्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता असल्याचे सांगत आहे.शासकीय रेखाकला परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना देण्यात येणार्या पारितोषिकाची रक्कम तब्बल १३ वर्षानंतर वाढवण्यात आली आहे.विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळातर्फे शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट) परीक्षा घेण्यात येते.रुपयांचे बक्षीस चार विषयांसाठी देण्यात येणार आहे. प्रत्येकी इनाम एलिमेंटरी




परीक्षेतील चार विषयांमधील प्रत्येक विषयाच्या १० अशा ४० विद्यार्थ्यांना पूर्वी १०० रुपयांच्या ऐवजी ५०० रुपयांचे बक्षीस देणार आहेत. इंटरमिजिएट परीक्षेतील विषयनिहाय प्रथम ४० विद्यार्थ्यांना पूर्वी १५० रुपयांच्या ऐवजी पुढील वेळी प्रत्येकाला एक हजार रुपये देण्यात येणार आहेत.

**एलिमेंटरीत अव्वल येणार्यांना दोन हजारांचे बक्षीस**

**प्रथम :** एलिमेंटरी परीक्षेच्या गुणवत्ता यादीतील एक ते वीस क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना पूर्वी दिल्या जाणार्या २५० रुपयांऐवजी आता दोन हजार रुपये मिळणार आहेत.

**द्वितीय :** २१ ते ४० क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना पूर्वी २०० रुपयांऐवजी १५०० रुपये दिले जातील.

**तृतीय :** ४१ ते १०० क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना पूर्वी १५० रुपयांच्या ऐवजी एक हजार रुपये पारितोषिक स्वरूपात मिळणार.

**राज्यस्तरीय पारितोषिक रकमेतही होणार वाढ**

शालेय स्तरावरील पारितोषिकांप्रमाणे राज्यस्तरीय पारितोषिकाच्या रकमेतही वाढ करण्यात आली आहे. आता प्रथम तीन क्रमांकासाठी अनुक्रमे १० हजार, ५ हजार, २ हजार ५०० रुपयांचे पारितोषिक मिळणार आहेत.

**इंटरमिजिएटसाठी ३ हजार**

**प्रथम :** इंटरमिजिएट परीक्षेतील पहिल्या २० विद्यार्थ्यांना पूर्वीच्या ३५० रुपयांऐवजी तीन हजार रुपये देणार आहेत.

**द्वितीय :** २१ ते ४० क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना पूर्वीच्या ३०० रुपयांऐवजी २५०० रुपये देण्यात येणार आहेत.

**तृतीय :** ४१ ते १०० क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना पूर्वीच्या २५० रुपयांऐवजी दोन हजार रुपये पारितोषिक स्वरूपात दिले जातील.

## फडणवीस सरकारचा निर्णय :

# आधारकार्ड जन्मतारखेचा पुरावा नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नागपूर :–** महाराष्ट्र सरकारने जन्मतारखेचा पुरावा म्हणून आधार कार्ड स्वीकारणे पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.बनावट जन्म प्रमाणपत्रे तयार करण्याचे प्रकार वाढत असल्याच्या तक्रारी आणि बेकायदेशीर कागदपत्रांच्या आधारे होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने हा निर्णय जाहीर करताच सर्व प्रकारची आधार-आधारित विलंबित जन्म प्रमाणपत्रे रद्द करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवरही कारवाई होणार असल्याची माहिती महसूल विभागाने दिली.

उत्तर प्रदेश सरकारने देखील असा निर्णय घेतला आहे. आधार कार्डाला कोणतेही जन्म प्रमाणपत्र जोडलेले नसते, त्यामुळे जन्माचा पुरावा म्हणून ते ग्राह्य धरणे चुकीचे आहे, असे उत्तर प्रदेश सरकारने म्हटले आहे. विशेष सचिव अमित सिंग बन्सल यांनी सर्व विभागांना यासंदर्भात स्पष्ट सूचना दिल्या




आहेत. महाराष्ट्रातही महसूल विभागाने जाहीर केलेल्या आदेशानुसार २०२३ च्या सुधारित जन्म-मृत्यू नोंदणी कायद्यानंतर आधारच्या आधारे तयार केलेली प्रमाणपत्रे कायदेशीर राहणार नाहीत. याशिवाय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संशयास्पद पद्धतीने जारी झालेल्या प्रमाणपत्रांची चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. उत्तर प्रदेश सरकारने देखील असा निर्णय घेतला आहे. आधार कार्डाला कोणतेही जन्म प्रमाणपत्र जोडलेले नसते, त्यामुळे जन्माचा पुरावा म्हणून ते ग्राह्य धरणे चुकीचे आहे, असे उत्तर प्रदेश सरकारने म्हटले आहे. विशेष सचिव अमित सिंग बन्सल यांनी सर्व विभागांना यासंदर्भात स्पष्ट सूचना दिल्या आहेत. महाराष्ट्रातही महसूल विभागाने जाहीर केलेल्या आदेशानुसार २०२३ च्या सुधारित जन्म-मृत्यू नोंदणी कायद्यानंतर आधारच्या आधारे तयार केलेली प्रमाणपत्रे कायदेशीर राहणार नाहीत. याशिवाय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संशयास्पद पद्धतीने जारी झालेल्या प्रमाणपत्रांची चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

# डिसेंबर महिन्यात गोल्डन कार्डसाठी विशेष मोहिम-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती,** ६पात्र नागरिकांना आरोग्याची सुविधा देण्यासाठी गोल्डन कार्ड देण्यात येत आहे. सदर कार्ड काढण्याची जबाबदारी आशा सेविकांवर देण्यात आली आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी कार्ड महत्वाचे असल्याने डिसेंबर महिन्यात गोल्डन कार्डसाठी विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.जिल्हाधिकारी कार्यालयात गोल्डन कार्ड नोंदणीसंबंधी बैठक पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, आयुष्मानच्या जिल्हा समन्वयक डॉ. अंकिता मटाले यांच्यासह आशा सेविका उपस्थित होत्या.जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी, आशा सेविकांना आता नवीन कार्ड नोंदणीसाठी २० रूपये तर वितरणासाठी १० रूपये मानधन मिळणार आहे. त्यामुळे आशा सेविकांनी यात सक्रीय सहभाग नोंदवावा. यासाठी येत्या दोन दिवसांत आशा सेविकांचे लॉगइन आयडी सक्रीय करावे. कार्डची नोंदणी होण्यासाठी मोहिम राबवावी लागणार आहे. यासाठी संपूर्ण डिसेंबर महिन्यात या नोंदणीवर लक्ष्य ठेवण्यात येणार आहे. नोंदणीचे काम गतीने होण्यासाठी आशांना लाभार्थ्यांच्या याद्या पुरविण्यात येणार आहे.नोंदणीसाठी तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, सामुदायिक आरोग्य अधिकारी, ग्रामसेवक यांच्या



सहकार्याने डिसेंबर महिन्यात मोहिम घेण्यात येणार आहे. या योजनेत रूग्णांवर उपचारासाठी जिल्ह्यातील ५१ रूग्णालये अंगीकृत असून नि:शुल्क उपचार करण्यात येतात. यासाठी नोंदणीला गती देण्यात येणार आहे. शिधा पत्रिकेवर या योजनेचा लाभ देण्यात येत आहे. त्यामुळे शिधापत्रिकेत नाव नसल्यास शिधापत्रिका अद्ययावत करावी. त्यानंतर ६० दिवसात लाभार्थ्यांचे नाव यादीत येणार आहे.यावेळी नोंदणीमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा सेविका निता खंडेझोड, वर्षा आडोळे, मुक्ता वानखेडे, गुंफा खडसे, वनिता पंचाळे, जयश्री देवळे, पंची दहिकर, काजल साम्बरकर, सिमा सोनोने, गिता गावंडे, इंदिरा मोहोड, कल्पना मेश्राम, शेषकन्या थोरात, सुनिता चौरकर यांचा जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा सेविकांचा सन्मान

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या हस्ते गोपाल नगर अंडरपासचे लवकरच लोकार्पण होणार

## कामाचा वेग व नियोजन करण्याचे आ. रवि राणांचे निर्देश

### मनपा आयुक्त सौम्या शर्मा, रेल्वेचे अधिकारी उपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–** गोपाल नगर अंडर पास बांधकामाची आ. रवि राणा यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणी दरम्यान मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक, रेल्वे विभागाचे अधिकारी व मनपा चे अधिकारी तसेच महारेलचे अधिकारी व कंत्राटदार तौसिफ उपस्थित होते.अंडरपास बांधकामातील विविध तांत्रिक बाबी, प्रलंबित कामे तसेच आढळलेल्या त्रुटींची तपशीलवार पाहणी करून आमदार रवी राणा यांनी संबंधित अधिकाऱ्यांनी कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच या संदर्भात ते लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असून, पुढील दोन महिन्यांत गोपाल नगर



अंडर पास लोकांचे सेवेत खुला करण्यात येईल. त्यामुळे कामाचा वेग वाढविण्याचे नियोजन करण्याचे आ. रवी राणा यांनी कामाची पाहणी करताना आ. रवि राणा यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सांगितले. मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनीही संपूर्ण कामाची सूक्ष्म पाहणी करून गुणवत्तापूर्ण बांधकामावर भर देण्याचे निर्देश दिले.

मनपा व रेल्वे विभागाने समन्वयातूनपूर्ण करावे, असे त्यांनी सांगितले. अंडरपास परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे, लहान मुले, तरुण व ज्येष्ठ नागरिकांसाठी स्कायवॉक, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही सूचना या वेळी आमदार रवी राणा यांनी अधिकाऱ्यांना दिल्यात. स्थानिक नागरिकांशी चर्चा करून नाला खोलीकरण, बांधकाम मजबुतीकरण, सुधारितरस्ता बांधकाम याबाबतही आवश्यक निर्देश दिले.

तसेच गोपालनगर तापडिया मॉलसमोरील रस्त्यांचे सौंदर्याकरण व रस्ता बांधकाम त्वरित पूर्ण करण्यासाठी मनपा आणि बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना विशिष्ट सूचना देण्यात आल्या. यावेळी रेल्वेचे अभियंताराणे, मनपा चे कार्यकारी अभियंता पवार, सहा आयुक्त नरेंद्र वानखेडे, बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या पाहणीप्रसंगी माजी नगरसेवक सुनील काळे, सुमतीताई ढोके, कमलकिशोर मालानी, उमेश ढोणे, सचिन भेंडे, मिलिंद कहाळे, किरण अंबाळकर, इंद्रजीत नागदिवे, रोप पटेल, तुषार दुधे, अरविंद खाडे, गौतम हिरे, नितीन तायडे, नीरज गवई, अर्जुन दाते, वैभव बजाज, शहजाद, शिंदे साहेब, अंकुश पकडे, नितीन बोरेकर, सुरज मिश्रा, पराग चीमोटे, अंकुश आळे आदींसह मोठ्या संख्येने भाजपा व युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# दर्यापूरात श्री विजयग्रंथ महापारायण सोहळा निमित्त भाविकांची मांदियाळी

## हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

### विद्याताई पडवळ यांच्या सुमधुर वाणीने भाविक मंत्रमुग्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.दर्यापूर –** जय गजानन!,श्री गजानन! या नामाचा जयघोष करत हजारो महिला भाविक संत गजानन महाराज श्री विजयग्रंथ महापारायण सोहळयात तल्लीन झाले होते २७ नोव्हेंबर रोजी दर्यापूर येथील तरुण उत्साही मंडळाचे मैदान येथे दोन ते अडीच हजार भाविकांनी या श्री विजयग्रंथ महापारायण सोहळयात सहभाग नोंदविला.या ग्रंथाचे मुखोगत वाचक विद्याताई पडवळ-उनवने(ठाणे) यांच्या सुमधुर वाणीने भाविक मंत्रमुग्ध झाले होते.या महापारायण सोहळा नंतर पार पडलेल्या महाप्रसादाचा दोन ते अडीच हजार भाविकांनी लाभ घेतला.



या महापारायण सोहळ्याला सकाळी ६ वाजता कलशस्थापनेने सुरुवात झाली होती त्याप्रसंगी यजमान होऊन सुधाकर पाटील भारसाकडे व सौ मंदाकिनी सुधाकर भारसाकडे डॉक्टर नितीन सावरकर धनंजय देशमुख अमोल पवित्रकार अमोल गावंडे यांनी यजमानपद स्वीकारले होते व पूजाच्य केली या कार्यक्रमासाठी शेकडो सेवाधारी यांनी निस्वार्थी सेवा दिली.

त्यांचे संत शिरोमणी गजानन महाराज भक्त परिवार दर्यापूर यांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

यामध्ये पारायण सोहळा यशस्वी करण्याकरता दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा ध्रुवा पाटील सगळे, नितीन पाटील पवित्रकार, डॉक्टर सावरकर, झुंजार पाटील मापारी, इंजिनीयर पवन सगणे, तुळशीदास धांडे, राज पाटील भारसाकडे, मंगेश गावंडे अमोल गावंडे सुधीर बिजवे प्रभाकर पाटील तराळ शुभम घाटे व त्यांचे कोकर्डा येथील गजानन महाराज भक्त मंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले या मंडप सभागृहामध्ये सुंदर अशी गजानन महाराजांची प्रतिकृती असलेली रांगोळी सौ साखरे मॅडम यांनी रेखाटलेली होती ती रांगोळी सर्वांचं लक्ष वेधून घेत असताना दिसत होती.

# अंजनगाव सुर्जीत निवडणूक विभागाची पथनाट्याद्वारे मतदार जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अंजनगाव सुर्जी–** निवडणूक आयोगातर्फे मतदार आगृती, मतदार शिक्षण आणि मतदार साक्षरतेचा प्रसारासाठी श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथक तसेच तहसील कार्यालय व पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने बालाजीनगर, काठीपुरा येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष बीईओ सुधीर खोडे होते. बीडीओ जायभाये, स्वीप नोडल अधिकारी सालोडे, विस्तार अधिकारी सुशील अभ्यंकर, स्वीप टीम सदस्य संदीप खंडारे, प्रमोद दखने, राहुल रोकडे, रवींद्र कान्हेरकर, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.



नितीन घोडीले आदींची उपस्थिती लाभली. कार्यक्रमदरम्यान गटविकास अधिकारी जायभाये यांनी उपस्थितांना मतदानाचे महत्त्व समजवून सांगत हितगुज साधले. मतदान करणे हा प्रत्यक्ष नागरिकाचा फक्त मूलभूत अधिकारच नसून कर्तव्यदेखील आहे. म्हणून आपले कर्तव्य देशाचा नागरिक म्हणून पार पाडण्याकरिता मतदान करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

मतदारांनी कुठल्याही प्रलोभनांनाप्रभावित न होता योग्य उमेदवार निवडावा तसेच देशाच्या व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन बीईओ सुधीर खोडे यांनी आपल्या मार्गदर्शनात उपस्थितांना केले. आभार स्वीप टीम सदस्य संदीप खंडारे यांनी मानले. कार्यक्रमा दरम्यान राधाबाई सारडा महाविद्याल य वेथील राष्ट्रीय सेवा योजना पथकातील स्वयंसेवकांनी मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो या मतदान जनजागृतीपर पथनाट्याचे सादरीकरण केले. यामध्ये दिव्या मालधुरे, श्रुतिका सुरजुसे, सुनाक्षी टाले, अभिषेक धर्म, तेजस्विनी हायोड, गायत्री भगत, अमितधारपवार, ईश्वरी रोहनकर, आदित्य तायडे, ऋतुजा अड्गोकार व ईश्वरी येवले यांनी सहभाग घेतला. यावेळी रासेयो स्वयंसेवकांनी काठीपुरा, पान अटाई, जयस्तंभ चौक व वेगवेगळ्या ठिकाणी मतदार जनजागृती पथनाट्य प्रयोग दूर केले. आयोजनाकरिता संत गाडगेबाबा विचार वाटिका (काठीपुरा), तसेच वेथील महिला बचत गट पंचायत समिती, नगरपरिषद्, येथील स्वीप टीम रासेयो कार्यक्रम अधिकारी ममता येवतकार, अनिकेत भुयार, नविता मालाणी, स्वयंसेवक अविनाश वानखडे, तृप्ती खरात, अजय लव्हाळे, प्रतीक्षा पवार व क्षितिजा जैन आर्दींचे सहकार्य लाभले.

# विद्याभारती महाविद्यालयात नशामुक्ती जनजागृती अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–**
स्थानिक विद्याभारती महाविद्यालय कॅम्प अमरावती येथे अमली पदार्थां विरोधी टास्क फोर्सच्या माध्यमातून नशामुक्त भारत अभियान जनजागृती मोहीम राबविण्यात आली.अलीकडच्या काळात अमली पदार्थांची विक्री वितरणामुळे तरुण पिढीच्या सामाजिक, आर्थिक तसेच शारीरिक स्वास्थ्यावर गंभीर परिणाम होत आहेत. वाढत्या व्यसनाधीनतेमुळे कुटुंब व्यवस्था देखील ढासळत चालली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाने



राज्यात अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स स्थापन केली असून, त्याच अंतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, अमरावती तर्फे या महाविद्यालयात कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये पोलीस उपअधीक्षक श्री गजानन विखे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी निलेश येरणे, विनोद भगत, अभिराज इंदुरकर, रुपेश अंबोरे, भूषण पदमणे, शिवराज पवार, सुमेधबोधी पोहेकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत अमली पदार्थांचे व्यसन कसे टाळावे, त्याचे परिणाम किती घातक असतात तसेच युवकांनी समाजातील व्यसनाविरोधी उपक्रमांमध्ये सक्रीय सहभागी होण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्या डॉ. प्रज्ञा येनकर यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना सांगितले की. विद्यार्थ्यांनी नशा जर करायचा असेल तर तो अभ्यासाचा, चांगल्या गोष्टीचा करावा. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एमसीए विभाग प्रमुख डॉ. शिल्पा सरवैया, बीसीए विभाग प्रमुख डॉ. विनोद मोहोड, प्रा. राणा आफरीन शेख यांनी प्रयत्न केले.

# डिजिटल युगातही अद्याप जुन्या परंपरा कायम

## गाव खेड्यात मुक्कामाने लावले जातेय भांड्यांचे दुकान

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२९अचलपूर**
विज्ञानाने कितीही प्रगती केली आणि डिजिटल युग आले म्हटले तरी गाव खेड्यात ग्राहकांसोबत जुळून राहण्यासाठी जुन्या परंपरा मात्र कायम दिसते. काही गाव खेड्यात आठवडाभराच्या मुक्कामाने भांड्यांचे दुकान लावले जाते. गावातील शेतकरी, शेतमजूर पितळ, जर्मन,तांबे यांची जुनी भांडी मोडीत देऊन तर काहीजण नगदी रक्कम देऊनही नव्या भांड्यांची खरेदी करतात. गावात एकच दुकान लागत असले तरी या दुकानाने काही काळ गावाची शान वाढते. सेलू नजीकच्या धानोली (मेघे) या गावात एका वृक्षाखाली दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हे भांड्यांचे दुकान



थाटले गेले असून त्याचा आठवडाभरमुक्काम आहे. शेतकरी व शेतमजूर आपल्या घरात अडगळीत पडून असलेली जुनी पितळ, जर्मन, तांबे यांची भांडी तर काहीजण कीटकनाशकाचा वापर करून खाली झालेल्या जर्मनच्या लहान मोठ्या बाटल्या या दुकानदारांकडे भाव ठरवून मोडीत देतात व त्या बदल्यात नवे भांडे खरेदी करताना दिसून येत आहेत.


### संसारोपयोगी वस्तूंची विक्री.

या दुकानातून गरीब श्रीमंतांच्या संसारासाठी लागणारे गंज, कढई, पिंप, लहान मोठी भांडी, डब्बे अशा अनेक वस्तू येथे उपलब्ध असतात.दुकानदारांनाही जुन्या मोडीत येणाऱ्या वस्तूपासून जास्त लाभ होत असल्याने एका गावात आठवडाभर दुकान थाटून त्यांना बसणे परवडते.यामुळे गाव खेड्यातील लोकांना जागेवर वस्तू मिळत असल्याने मोठ्या तालुका स्तरावरील बाजारात जाण्याची गरज पडत नाही.

# गुलाबी मतपत्रिकेवर ठरणार नगराध्यक्षांचे भविष्य

## २ डिसेंबरला मतदानासाठी सार्वजनिक सुटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**




जिल्ह्यातील १० नगरपरिषद व २ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होत आहे. यंदाच्या निवडणुकीत नगराध्यक्ष व सदस्य पदासाठी मतपत्रिकांचे स्वतंत्र रंग निश्चित करण्यात आले असून यामुळे मतदारांना मतदान यंत्रावर (बीयू) निवड करणे अधिक सुलभ होणार आहे. नगराध्यक्ष पदासाठी फिक्या गुलाबी रंगाची तर नगरपरिषद सदस्यांसाठी पांढरी, फिक्या निळ्या आणि फिक्या पिवळ्या रंगाच्या मतपत्रिका असतील. नगरपंचायत सदस्यांसाठी मात्र फक्त पांढऱ्या रंगाची मतपत्रिका राहणार आहे.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नियम १६ (४) नुसार नमुना १६ प्रसिद्ध केला असून देवनागरी लिपीनुसार उमेदवारांचा क्रम निश्चित करून मतदान यंत्रावर त्यानुसार मतपत्रिका लावण्यात आल्या आहेत. २१ ऑक्टोबर २०१६ च्या अधिसूचनेनुसार मतपत्रिकांचे रंग निश्चित करण्यात आले आहेत. सप्टेंबर २०२५ च्या सूचना पत्रिकेप्रमाणे या मतपत्रिका बीयूवर लावण्याची प्रक्रिया पूर्ण केली गेली असून मतदान केंद्राध्यक्ष व कर्मचार्यांना प्रशिक्षणही देण्यात आले आहे.प्रत्येक मतदाराला 'नोटा'चा पर्यायही उपलब्ध असून नगराध्यक्ष व सदस्य पदासाठी मतदान केल्याशिवाय मतदान प्रक्रिया पूर्ण होणार नाही. मतदान यंत्रांसाठी छापण्यात आलेल्या मतपत्रिका शासकीय मुद्रणालयात तयार कराव्यात, अशी सूचना आयोगाने केली आहे. अन्यत्र छपाई केल्यास अतिरिक्त मतपत्रिका शिल्लक राहू नयेत, याची दक्षता घेण्यात आली आहे.मतदानाच्या दिवशी मतदारांना मतदानाचा हक्क निर्बंधाशिवाय बजावता यावा, यासाठी राज्य शासनाच्या २६ नोव्हेंबरच्या अधिसूचनेनुसार संबंधित नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्रात सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात आली आहे.

# चौराकुंड पशुवैद्यकीय दवाखाना ४-५ वर्षांपासून कुलूपबंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९धारणी**



धारणी तालुक्यातील चौराकुंड येथे स्थापन केलेला पशुवैद्यकीय दवाखाना गेल्या चार ते पाच वर्षांपासून पूर्णपणे बंद आहे. शेकडो पशुपालकांच्या जीवनावश्यक सेवांवर बसलेल्या या कुलूपामुळे प्रशासनाची गंभीर निष्क्रियता व बेफिकिरी उघड झाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे पशुधन विकास अधिकारी आणि इतर कर्मचारी दवाखान्यात अनुपस्थित, तरीही त्यांना पगार मात्र नियमित सुरू! गरज भासल्यावर पशुपालकांना एकाही अधिकाऱ्याचा पत्ता लागत नाही, दवाखान्यात एकही कर्मचारी दिसत नाही, परंतु सरकारी खजिन्यातून वेतनाचे पैसे मात्र वेळेवर जात आहेत हे सर्व नेमके कोणत्या आधारावर चालले आहे? याबाबत स्थानिक प्रशासनाकडेही कोणती स्पष्ट माहिती नाही!चौराकुंड पशुधन चिकित्सालयासाठी सरकारने एकूण चार पदांची मंजुरी दिली आहे.पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, पट्टीबंधक इत्यादी. मात्र ग्रामीणांच्या मते या चौघांपैकी एकाही कर्मचाऱ्याला दवाखान्यात कधी उपस्थित पाहिले गेले नाही. यामुळे मोठा प्रश्न निर्माण होतो की हे कर्मचारी शेवटी काम करतात तरी कुठे? आणि कामच करत नसतील, तर त्यांचे पगार मंजूर कोण करत आहे? वरिष्ठ अधिकाऱ्यांची निष्काळजीपणा इतका की दवाखाना बंद का आहे, याची माहिती देण्यासाठीही कोणी पुढे येत नाही.पशुपालकांना होणाऱ्या मोठ्या नुकसानीकडे कोणाचे लक्ष! विभागातील सर्वांगीण अव्यवस्थेचे हे चित्र आहे.धारणी तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामीण भागात पशुधन हेच शेतकऱ्यांचे मुख्य उत्पन्नाचे साधन आहे. अशा परिस्थितीत दवाखाना वर्षानुवर्षे बंद असणे म्हणजे शेतकऱ्यांवर थेट आर्थिक आघात आहे. प्रशासनाची शांतता पाहता कुठेतरी मोठा भ्रष्टाचार सुरू असल्याची शक्यता ग्रामीण व्यक्त करत आहेत. तात्काळ चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी त्यांनी केली आहे.मेलघाटमधील पशुसंवर्धन विभागात सुरू असलेल्या गंभीर अनियमिततेचे हे प्रकरण ठळक उदाहरण म्हणून समोर आले आहे.

# म्हैसपूर येथील ग्रामपंचायत वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान उत्साहात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ वाठोडा शुक्लेशवर**

भातकुली पंचायत समिती अंतर्गत येणार्या म्हैसपूर येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना अंतर्गत गटविकास अधिकारी तुषार दांडगे यांनी विविध कामांचा आढावा घेऊन पाहणी केले, तसेच जिल्हा परिषद मराठी शाळेच्या वतीने झाडे लावा झाडे जगवा स्वच्छता निरंतर जीवन जिथे स्वच्छता तिथे आरोग्य सुदृष्ट राहणार आणि आपला परिसर स्वच्छता असणार अशा प्रकारचे फलक हातामध्ये घेऊन विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅली काढली,

लोकसभागातून वनराई बंधारा उभारण्यात आला, ग्रामपंचायत च्या वतीने रस्ते पिण्याच्या पाण्याचे, स्मशानभूमी जिम आणि सांडपाणी याचे नियोजन करून सोयी सुविधा पुरविण्याचे नियोजन उत्कृष्टरित्या पार पाडले,प्रधानमंत्री आवास प्लस अंतर्गत उद्दिष्टानुसार घरकुल बांधकाम पूर्ण करण्यात आले असून सर्व १००% हप्ते व मनरेगा मधून मिळणारी मजुरी शंभर टक्के रक्कम अदा करण्यात आली आहे,क्यू आर कोड द्वारे एका दिवसात १०००००/- (१ लक्ष रुपये विक्रमी वसुली करण्यात आली आहे,ग्रामपंचायत च्या वतीने आरोग्य रोग निदान शिबिर देखील राबविण्यात आले, या उपक्रमाचा नवा आदर्श ठरला आहे.तसेच यावेळी प्रल्हाद तेलंग विस्तार अधिकारी पंचायत समिती, सुनील ठाकरे कनिष्ठ अभियंता बांधकाम, सरपंच नीलकंठ ढोके, ग्रामपंचायत अधिकारी युवराज जाधव, मार्गदर्शक शिवा पाटील पोलीस पाटील, यांच्यासह मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा 8605948853

# निवडणूक प्रचारात लक्षवेधी चिन्हांवर अपक्षांचा जोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**




नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीसाठी बुधवारी सर्व उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय, राज्य पक्षांचे चिन्ह राखीव आहेत. याशिवाय अपक्षांसाठी १९४ चिन्हे आहेत. यामधील लक्षवेधी चिन्ह घेण्याकडे अपक्षांचा जोर होता.

नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अपक्षउमेदवारांसाठी राज्य निवडणूक आयोगाने १९४ मुक्तचिन्हे उपलब्ध केली आहेत. या निवडणुकीमध्ये प्रचाराला फक्त चार दिवस मिळत असल्याने लक्षवेधक आणि आकर्षक चिन्ह मिळविण्याकडे अपक्ष उमेदवारांचा जोर दिसून आला. यामध्ये नियमाने प्रथम अर्ज करणाऱ्याला किंबहुना कुठे टायदेखील झाला. मात्र या उमेदवारांनी दिली. प्रथम प्राधान्य देण्यात आल्याची माहिती अपक्ष उमेदवारांसाठी असणाऱ्या१९४ मुक्तचिन्हांमध्ये रोजच्या दैनंदिन वापरातील वस्तू, फळे, भाजीपाला, वाहने, खाण्याच्या वस्तू, क्रीडा साहित्यासह अन्य प्रकारची चिन्हे आहेत. मात्र उमेदवारांचा कल नेहमी वापरायच्या परंतु ठळकपणे दिसून पडतील तसेच मतदारांना संभ्रम होणार नाही, अशा चिन्हांकडे कल दिसून आला. नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूकीत अपक्ष उमेदवारांना चिन्ह मिळेपर्यंत प्रमुख राजकीय पक्षाचे उमेदवार वगळता अडचण झाली होती. परिणामी कमी वेळेत मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी कसरत होत आहे.

**अर्जामध्ये तीन चिन्हांची नोंद अनिवार्य**

उमेदवारी अर्ज भरताना तीन मुक्तचिन्हे नमूद करणे बंधनकारक होते. त्यानुसार अपक्ष उमेदवारांनी नमूद केलेल्या प्राधान्यक्रमानुसार निवडणूक चिन्हांचे वाटप केले. निवडणूक चिन्ह वाटपात राष्ट्रीय स्तर पाच पक्ष, राज्यस्तर पाच पक्ष आणि इतर राज्यस्तर पक्षांचे नऊ चिन्हे राखीव आहेत.

**चिन्ह मतदारांपर्यंत पोहोचणार कसे ?**

उमेदवारांना २६ नोव्हेंबरला निवडणूक चिन्ह वाटप झाल्याने आयोगाच्या निर्देशाप्रमाणे ३० नोव्हेंबरच्या रात्री १२ पर्यंत प्रचार करता येणार आहे. त्यामुळे चार-पाच दिवसांत उमेदवारांना त्यांचे निवडणूक चिन्ह प्रत्येक मतदारांपर्यंत पोहोचवावे लागणार आहे.

# जिल्ह्यात बाजरीच्या मागणीत वाढ

## चपातीपेक्षा बाजरीची भाकरी पचनास अधिक अनुकूल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**



थंडीच्या दिवसांत शरीरालाअधिक उष्णता व पोषण देणारा आहार घेण्याकडे नागरिकांचा कल झपाट्याने वाढत आहे. शरीराला 'इनबिल्ट हीटर' असलेली बाजरी ग्रामीण भागाबरोबरच आता शहरातही मोठ्या प्रमाणावर पसंत केली जात आहे. चपातीपेक्षा बाजरीची भाकरी पचनास अनुकूल व शरीराला अधिक ऊब देणारी असल्याने बाजरी खाण्याचा सल्ला आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. श्रीकांत यांनी दिला आहे.अमरावती जिल्ह्यातील पारा मागील काही दिवसांत अचानक कमी झाला आहे. सायंकाळी ७ वाजल्यापासून ज्येष्ठ नागरिक घराबाहेर पड़णे बंद करत आहेत. या पार्श्वभूमीवर अनेकजण हेल्दी अन् उष्णता देणारे पदार्थ खाण्यास पसंती देत आहेत. त्यामुळेच अमरावती शहरातील बाजारपेठेतगहू ३०-३५ रुपये किलो मिळत असताना बाजरी ५० ते ६० रुपयांवर पोहोचली आहे. ज्वारीही यंदा ४५-५५ रुपये किलोच्या घरात आहे. जिल्ह्यात बाजरी व ज्वारीचे उत्पादन होत नसल्याने जास्त भाव देऊन विकत घ्यावी लागते. ग्राहकांना आर्थिक ताण सहन करावा लागतो.बाजरीची मागणी वाढली आहे. मात्र, हवामानातील बदल, पावसाचा विलंब आणि उत्पादनातील घसरण यामुळे यंदा बाजरीचे दर गव्हापेक्षाही अधिक आहेत. त्यातच जिल्ह्यात बाजरीचे उत्पादन होत नसल्याने मराठवाड्यातून आयात केली जात आहे.

**बाजरी खाण्याचे काय आहेत फायदे?**

बाजरी थंडीत नैसर्गिक 'हीट' निर्माण करते, पचनासाठी अत्यंत उत्तम, मधुमेह, स्थूलता असलेल्या व्यक्तींना फायदेशीर, हाडांसाठी कॅल्शियमयुक्त, हृदयविकाराचा धोका कमी करण्यात सहायक, रोगप्रतिकारकशक्ती वाढवते, दीर्घकाळ तृप्त ठेवते - ओव्हरहीटिंग कमी, थंडीत शरीराला ऊब देते, बाजरीतील अमिनो ॲसिड, फायबर व बायोॲक्टिव्ह घटक शरीराचे तापमान संतुलित ठेवून थंडी जाणवत नसल्याने आरोग्य उत्तम राहते.

# अमरावतीमध्ये युथ हॅपीनेस प्रोग्रामला प्रतिसाद

## व्यक्तिमत्व विकासवर भर, अमरावतीतील युवकांनी केला नशामुक्ती संकल्प



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

अमरावतीत आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे आयोजित युथ हॅपीनेस प्रोग्रामला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे. शहरातील शेकडो युवकांमध्ये एक नवीन सकारात्मक जागरूकता निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. १९ ते २३ नोव्हेंबर दरम्यान चिराग पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमाने अमरावतीतील तरुणांना तणावमुक्त जीवनशैली, आत्मविश्वास आणि सामाजिक जबाबदारीची नवी दिशा दिली. युवकांमधील तणाव, नैराश्य, एकाग्रतेचा अभाव व नकारात्मकता दूर करण्याच्या उद्देशाने राबवण्यात आलेल्या या कार्यक्रमात सौम्य योग, प्राणायाम, ध्यान तसेच व्यक्तिमत्व विकास यांसारख्या सत्रांचा समावेश होता.

अमरावतीतील आयोजनासाठी उमेश गिलोरकर, राजेश गडबैल, सचिन माने, श्वेता खंडेलवाल, आकृती सिकंची, डॉ. प्रीती रावल, शरद राऊत तसेच चेतन राऊत, चंद्रकांत पोपट, अनिरुद्ध कोल्हे, अमोल इंगळे, संदीप मदणकर, राम धामण्डे आणि संपूर्ण आर्ट ऑफ लिव्हिंग टीमचे सहकार्य मोलाचे ठरले. कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी सर्व सहभागी युवकांनी एक ऐतिहासिक संकल्प घेतला.

ड्रग्स फ्री अमरावती ना नशा करणार, ना नशा करू देणार या सामूहिक प्रतिज्ञेने हॉल दणाणून गेला. तसेच अमरावतीतील युवकांमध्ये नशामुक्तीबाबत नवी जाणीव आणि दृढ संकल्प निर्माण झाला. आयोजकांच्या मते, हा उपक्रम अमरावती साठीच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील युवकांसाठी एक प्रेरणादायी आदर्श ठरत आहे. कार्यक्रमामुळे तरुणांमध्ये मानसिक स्थैर्य, सकारात्मकता, आत्मविश्वास आणि समाजा बद्दलची जाणीव वाढली असून आगामी काळात युथ फॅमिली प्रोग्रामच्या माध्यमातून हे अभियान अधिक व्यापक पातळीवर राबवण्याची तयारी सुरू आहे. अमरावतीच्या युवकांचा हा शक्तिशाली संकल्प नशामुक्त समाजाच्या दिशेने एक मोठे पाऊल पडले आहे.

# बाभळी येथील अद्यावत बिल्डिंगमध्ये कार्यरत असलेली गुलर घाट आश्रम शाळा दर्यापुरातून हलवण्याचा प्रयत्न

## पालकांसह विद्यार्थी व कर्मचारी वर्ग आहे नाराज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९दर्यापूर**



बाभळीअंजनगाव रोडवर बाबळी येथील गुलर घाट आश्रम शाळेची दयनीय अवस्था असल्याची बातमी धारणीवरून प्रकाशित करण्यात आली ती अतिशय खोटी आणि वस्तुस्थितीला धरून नसल्याचे दिसून येत आहे इमारत अद्यावत असून मुलांसाठी स्वतंत्र निवास व्यवस्था असताना तसेच मुलांना योग्य ते संडास बाथरूम या सर्व बाबी पुरेसं २४ तासाचे पाणी असताना ती हलवण्याचा प्रयत्न हा करत आहेत हे योग्य नाही असे मत रोहिणी फाउंडेशनचे अध्यक्ष किशोर ठाकूर यांनी व्यक्त केले त्यांनी अंजनगाव येथील ज्या जागी आश्रमशाळा हलवण्याचा प्रयत्न होत आहे त्या जागेला भेट दिली आणि तेथील पाणी केली तेव्हा संपूर्ण वर्ग टीनाद्वारे उभारण्यात येत असल्याचे दिसून आले व तेथे मंगल कार्यालय कार्यरत असून त्याच ठिकाणी ही आश्रमशाळा हलवण्याचा डाव संबंधित आदिवासी विभागाचे अधिकारी करीत असल्याचे त्यांना दिसून आले दर्यापूर तालुक्यातील बाबळी या परिसरात गेले कित्येक वर्ष झाले शाळेचे वातावरण असलेले व त्याच परिसरात ही आश्रम शाळा कार्यरत आहे सर्व संयुक्त आश्रम शाळा असून तेथे विद्यार्थी शिक्षण घेत आहे व त्यांना शिकवणारे शिक्षक सुद्धा सर्व कार्यरत आहे सर्व काही व्यवस्थित असताना शाळा हलवण्याचा जो प्रयत्न होत आहे त्यावर विद्यार्थ्यांसह पालकांची व शिक्षकांची नाराजी असल्याचे दिसून आले तेव्हाही शाळा याच ठिकाणी कार्यरत ठेवावी अशी मागणी रयनी फाउंडेशन दर्यापूरचे अध्यक्ष किशोर ठाकूर, उपाध्यक्ष संतोष मिसाळ सहसचिव अमोल कंटाळे पावर ऑफ मीडियाचे अध्यक्ष शशांक देशपांडे पत्रकार गजानन देशमुख यांनी केली आहे लवकरच ते प्रकल्प अधिकारी धारणी यांना जाऊन भेटणार आहेत व त्यांच्याकडे लेखी अर्जाद्वारे मागणी करणार आहेत वेळ पडल्यास रस्त्यावर उतरण्याची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले

# मतदार विचारताहेत उमेदवारांना जाब; मूलभूत समस्यांचा वाचला जातोय पाढा!

## जिल्ह्यात निवडणूक वातावरण तापले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

नगरपरिषद निवहतुकीचा प्रचार शिगेला पोहोचत असताना शहरातील मतदार आता पानी सते, स्वच्छता पाढा वाचताना दिसत आहेत.अनियमितता, सत्याची दुरवस्था, ट्रेनेजची विकट निजी स्वचाहतेचा अभार स्ट्रीट लाइटनी का कवरा आपन अतिक्रमण, घरकुल योजना आणि आरोग्य सुविधा सर्व समस्यांचा व्यापक पाढा मतदार उमेदकरापुढे वाचत आहेत.

सर्वसाधारण चित्र पाहता, पाणीपुरवठा आणि रस्त्यांची अवस्था है सर्वात ज्वलंत मुद्दे ठरत आहेत. काही प्रभागांमध्ये नाल्यांची साफसफाई, पावसाळ्यातील पाणी साचणे, कचरा उचलण्याचा अनियमित वेग, आणि बाजारपेठेतील वाहतूक कोंडी या समस्याही वारंवार पूढे येत आहेत.शिवाय ज्या ठिकाणी जुनेच मेहरे निवडणूक लबत आहेत, अशा प्रभागामध्ये आतापर्यंत अर्धवट असलेलया विकासकामांबाबत जाब विचारण्यात चैत आहे. समाया चरितण्याची मागणी आहे उमेदवारांकडूनही पूर्ण करण्याचे आासन दिले जात आहे.



### उमेदवार ऐकताहेत नागरिकांच्या तक्रारी

घरगुती भेटी, छोट्या-छोट्या सभा आणि बैठकीत अनेका प्रश्न नेहमीच उमेदवारांसमोर ठेवाने जात असून, विविध पक्षांचे उमेदवार नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेत आहेत निवडून आल्यास नियमित पाणीपुरवठा दर्जेदार रस्ते, सांडपाणी व्यवस्वेतील सुधारणा, स्वाहा मोहीम, आरोग्य सुविधांचे बळकटीकरण, तरुणासाठी उपक्रम आणि आधिक पारदर्शकता या मुद्यांनी धान्याने काम करू, अशी हमीही ते देत आहेत. आता पुन्हा प्रचाराला वेग वैष्णार असून, स्थानिक समस्याच्या समाधानासाठी उमेदवार कोणते ठोस आराखडे जाहीर करतात, याकडे मतदारांचे लक्ष आहे.

# एम डी ड्रॅगचा मास्टरमाइंड नागपुरातून पकडला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

महिना भरापूर्वी गाडगे नगर पोलीस स्टेशन परिसरात शहरातील एका ड्रग्ज तस्कराकडून ५६ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले होते. त्यानंतर, गुन्हे शाखेने हे ड्रग्ज पुरवणाऱ्या फैजान अहमदला नागपूर येथून अटक केली. या प्रकरणात, गुन्हे शाखेने पुन्हा विदर्भातील एका ड्रग्ज डिस्ट्रीब्यूटरला नागपूर येथून अटक करून अमरावती येथे आणले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव शेख शाहिद शेख काशिफ (३५, गांधीनगर, नागपूर) आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १५ ऑक्टोबर रोजी गुन्हे शाखेने गोपनीय माहितीच्या आधारे गाडगे नगर पोलीस स्टेशन परिसरातील पांढरी हनुमान मंदिरपरिसरात सापळा रचला आणि आरोपी अब्दुल रजिक अब्दुल ताहिर (३२, अलहिलाल कॉलनी) याला अटक केली. त्याच्याकडून ५लाख ८० हजार रुपयांचे ५६ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले. पोलिसांनी चौकशी केल्यानंतर अब्दुल रझाकने सांगितले की त्याने हे ड्रग्ज नागपूरमधील फयाज अहमद नावाच्या व्यक्तीकडून मिळवले होते.गुन्हे शाखेने तात्काळ नागपुरात येऊन फयाज अहमद अल्ताफअहमदला अटक केली आणि त्याला अमरावतीला आणले. फयाज नागपूर आणि आसपासच्या शहरांमध्ये ड्रग्ज तस्करीत सहभागी होता. फयाज अहमदची चौकशी चौकशी केली असता, या ड्रग्ज तस्करीच्या कारवाईत विदर्भातील एक प्रमुख वितरकही सहभागी असल्याचे उघड झाले. गुन्हे शाखेने त्याला नागपुरात चार वेळा अटक करण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु तो नेहमीच पोलिसांना चकमा देत होता. दरम्यान, एका गुप्त माहितीवरून कारवाई करत, गुन्हे शाखेने नागपूर नार्कोटिक्स विभागाच्या सहकार्याने गुरुवारी, २७ नोव्हेंबर रोजी रात्री एमडी ड्रग्ज वितरक शेख शाहिद शेख काशिफ याला अटक केली. अटकेनंतर त्याला अमरावतीला आणण्यात आले. शेख शाहिदवर सक्करदरा आणि नंदनवन पोलिस ठाण्यात अशाच प्रकारच्या ड्रग्ज तस्करीचे आरोप असल्याचेही माहिती आहे.

**अमरावतीसह नागपुरात मोठे रॅकेट**

वृत्तानुसार, नागपुरात अटक झालेला शेख शाहिद मुंबईतील ड्रग्ज माफियांकडून ड्रग्ज खरेदी करत असे आणि विदर्भात ते पुरवत असे. नागपुरात त्याचे मोठे रॅकेट होते. त्याने अमरावतीमध्येही लहान-मोठ्या ड्रग्ज तस्करांचे जाळे उभारले होते.

**प्रति ग्रॅम ५,००० रुपये दराने विक्री**

आरोपीच्या चौकशीत असे दिसून आले की हे एमडी ड्रग्ज ग्राहकांना ५,००० रुपये प्रति ग्रॅम दराने विकले जात होते. हे लक्षात घेण्यासारखे आहे की कोणताही सामान्य माणूस खरेदी करून शकत नाही, म्हणून श्रीमंत कुटुंबातील तरुण पिढी हे ड्रग्ज वापरत आहे.

# प्रचार दौरा सोडून प्रकाश मारोटकरची नाफेड खरेदीवर धाड



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव नगरपंचायत निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असतांना शिवसेना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या युतीच्या उमेदवारांच्या प्रचार रॅली सुरू असताना एका शेतकऱ्यांचा नाफेड खरेदी केंद्रावर शेतकऱ्याचा सोयाबीन माल परत करत असल्याचे फोन आले. प्रकाश मारोटकर यांनी प्रचार रॅली सोडून थेट नाफेड खरेदी केंद्रावर धाड टाकली आणि शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करावे परत पाठवल्यास अधिकाऱ्यांना बांधून मारू असा इशारा दिला एकीकडे सगळे नेते निवडणुकीच्या प्रचारात व्यस्त असून फक्त कामाच्या भरवशावर आणि फक्त काम म्हणजे काम आर्थिक परिस्थिती नसतांना निवडणुकीच्या रिंगणात असलेले प्रकाश मारोटकर निवडणुकीच्या काळात सुद्धा शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी आक्रमक होताना दिसून आले.

# प्रभाग एकमध्ये स्वच्छतेची दयनीय अवस्था; नाल्या तुडुंब, घंटागाडी ठप्प

## क्षेत्रीय कार्यालयात नागरिकांनी टाकला कचरा



आम्ही कर भरतो, मग स्वच्छता सेवा आमच्यापर्यंत का पोहोचत नाही? असा सवाल नागरिक करीत आहेत. परिस्थिती कायम राहिल्यास मोठ्या प्रमाणात आंदोलन उभारण्याचा इशारा नागरिकांनी दिला असून त्याची संपूर्ण जबाबदारी महानगरपालिका प्रशासनावर राहील,

**चंदू खेडकर**
**प्रहार संपर्क प्रमुख**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ अमरावती**

प्रभाग क्रमांक एकमध्ये स्वच्छता व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याची गंभीर बाब समोर आली आहे. परिसरातील नाल्या तुडुंब भरून वाहत असून अनेक ठिकाणी नाल्यांचे पाणी रस्त्यांवर येत आहे. शेगाव-रहाटगाव मुख्य रस्त्यालगतची नाली तर गेले अनेक दिवस रस्त्यावरच वाहत असल्याची परिस्थिती कायम आहे. विविध कॉलनींमध्ये नाल्यांची साफसफाई न झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना वाढत आहे.आज संतापलेल्या नागरिकांनी महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयात कचरा आणून टाकला.

याशिवाय घरगुती कचरा गोळा करण्यासाठी येणारी घंटागाडी गेल्या तीन ते चार महिन्यांपासून बंद पडली आहे. वारंवार प्रत्यक्ष तक्रारी आणि ऑनलाईन नोंदवलेल्या तक्रारी असूनही महानगरपालिका प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिणामी कचरा घरातच रेंगाळत राहिल्याने अनेकांना आपल्या दैनंदिन कामात अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे.

अनेक नागरिक विविध सरकारी विभागांत नोकरी करत असल्याने आधी कचरा टाकायला जावे का आपल्या कर्तव्यावर, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. संबंधित स्वच्छता अधिकारी व निरीक्षकांकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही सुधारणा न दिसल्यामुळे नागरिकांचे हाल अधिकच वाढले आहेत.

# लग्नात पाहुण्यांपेक्षा कार्यकर्त्यांचीच गर्दी निवडणुकांचा माहोल, विवाह सोहळ्यांनाही चढला रंग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

दिवाळी आणि कार्तिकी एकादशीनंतर लगीनसराराईला उधाण आले असताना, विवाहसोहळ्यात पाहुण्यांपेक्षा निवडणूक कार्यकर्त्यांचीच गर्दी वाढल्याचे चित्र ठळकपणे दिसत आहे.

तुळशी विवाहानंतर सुरू झालेल्या लग्नसराईमुळे मंगल कार्यालय मालक, पौरोहित्य करणारे, पारंपरिक वाद्यवृंद, केटरिंग व्यावसायिक आणि घोडे-मांडव मालकांची जोरदार चलती सुरू आहे. व्यवसाय तेजीत असला तरी या लग्नांमध्ये खऱ्या अर्थाने वऱ्हाड दिसत नाही; त्याऐवजी विविध पक्षांचे कार्यकर्ते आणि इच्छुकांची रेलचेल सुरू आहे.

सध्या उपलब्ध तारखा मिळवणं अवघड झालं आहे. अनेक ठिकाणी मंगल कार्यालये फुल्ल बुक असून, त्यांच्या रिकाम्या तारखांनुसारच मुहूर्त ठरविण्याची वेळ नववधू-वर पक्षांवर येत आहे. त्यातच नगरपरिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून, जिल्हा परिषद वपंचायत समिती निवडणुकीची शक्यता वाढली आहे. त्यामुळे जनसंपर्क वाढविण्यासाठी माजी नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, तसेच स्वयंघोषित पुढारी विवाहसोहळ्यांत ठाण मांडन बसताना दिसत आहेत.यामुळे माईक हातात घेऊन स्वागत करणाऱ्यांची मात्र दमछाक होत आहे. कोणाचे नाव वगळले जाऊ नये म्हणून ते अक्षरशः लिस्ट हातात घेऊनच पाहुण्यांचे स्वागत करत आहेत.

**स्टेजवर शुभेच्छांचा पाऊस; मुहूर्त टळण्याची शक्यता**

वधू-वरांना आशीर्वाद देणाऱ्यांची रांगही प्रचंड वाढत आहे. काहीजण स्टेजवर येताच दोन्ही कुटुंबांचा इतिहास सांगू लागतात, जवळीक सांगतात, संबंध नसतानाही ओळख मिरवतात. काही जण तर नवरा-नवरींना भावी आयुष्यासाठी सल्ले देण्यात गर्क होतात. त्यामुळे लग्नाची मुख्य वेळ पुढे ढकलली जात असून, खऱ्या मांडवातील विधींची गती मंदावते.

**लवकर निघणाऱ्यांची घाई; यजमानांची पंचाईत**

काही पाहुण्यांना एका दिवसात अनेक लग्नांचे निमंत्रण असल्यामुळे ते सकाळपासूनच मंगल कार्यालयात हजेरी लावून निघून जातात. लग्नसोहळा सुरू झाला की, दोन मिनिटांत नमस्कार करून बाहेर पडतात. अशा प्रकारामुळे नवरा-नवरींपासून मामापर्यंत सगळ्यांनाच ताटकळावे लागते. निवडणुकीच्या धामधुमीत लग्नसोहळेही राजकीय रंग घेत असल्याचे विश्लेषकांकडून सांगितले जात असून, पाहुण्यांपेक्षा कार्यकर्त्यांची अधिक उपस्थिती ही चिमूर तालुक्यात सध्या चर्चेची मुख्य बाब बनली आहे.

# अंजनगाव सुर्जी मध्ये नगराध्यक्ष पदासाठी चौरंगी लढत

## युती-आघाडी फिसकटल्याने सर्वांचीच प्रतिष्ठा पणाला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीचा राजकीय नकाशा आता स्पष्ट झाला असून, युती न झाल्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडीत राजकीय तडजोड फसल्याचे समीकरण उघडकीस आले आहे. या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी एकूण सात उमेदवार आहेत, ज्यात राजकीय पार्श्वभूमी असलेले चार प्रमुख चेहरे तसेच एक एम आय एम पक्षाच्या उमेदवारांचा समावेश आहे.शहरात नगरपरिषद निवडणुकीसाठी शिंदेसेनेकडून डॉ स्पृहा डकरे,भाजपकडून अविनाश गायगोले, उबाठा गटाकडून यश लवटे, काँग्रेसकडून आयशा बानो रशिद खा, तर एम आय एम चे विनीत डोंगरदिवे हे प्रमुख उमेदवार आहेत. तर इतर दोन स्वतंत्र उमेदवार नगराध्यक्ष पदाचे आहेत. एम आय एम आणि काँग्रेस चे उमेदवार मैदानात उतरल्या असल्यामुळे मुस्लिम मतांचे विभाजन होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, त्याचा फायदा भाजपला होतो की आणखी



कोणाला, हे येणारा काळ ठरविणार आहे. शिवसेना शिंदे गटाची भाजपची आघाडी न झाल्यामुळे शिंदे गटाकडून डॉ स्पृहा डकरे नगराध्यक्ष पदासाठी मैदानात उतरल्या मुळे एकाच समुदायात मतांचे विभाजन होण्याची शक्यता असुन यांचा फायदा ठाकरे गटाला होण्याची शक्यता नाकारता येत नाहीअंजनगाव सुर्जी नगरपरिषदेसाठी सर्वच राजकीय पक्षांची युती फिसकटल्याने उमेदवारांसमोर स्वतंत्र लढत अपरिहार्य झाली आहे. तसेच या गुंतागुंतीमुळे ही निवडणूक कधी नव्हे एवढी रोचक झाली आहे.एम आय एम पक्षाने नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी उभी केल्यामुळे समीकरणे बदलली असून येथील नगरपरिषदेची निवडणूक ही अत्यंत रोचक बनली आहे तर बलाढ्य उमेदवारांची राजकीय प्रतिष्ठा पणाला लागली आहे. आमदार गजानन लवटे यांच्या प्रतिष्ठेसाठी ही निवडणूक महत्त्वाची ठरणार असून, त्यांचे सुपुत्र यश लवटे हे उबाठा गटाकडून मैदानात उतरले आहे तर भाजपचे अविनाश गायगोले आणि शिंदे गटाकडून डॉ स्पृहा डकरे यांनी देखील आपली राजकीय प्रतिष्ठा पणाला लावली आहे. काँग्रेस पक्षाच्या वतीने आयशा बानो रशिद खा तर एम आय एम पक्षाने विनित डोगरदीवे यांना उमेदवारी दिल्यामुळे ही लढत अधिक कठीण ठरली आहे

अंजनगाव शहरात प्रचाराचे रणांगण तापले असून निवडणूक निकाल शहराचे आणि परिसराचे राजकीय भविष्य ठरवणार आहे

# मित्रपक्षांचे स्वतंत्र रिंगण, ज्येष्ठ नेत्यांच्या सभांमुळे चुरस वाढलीनगरपरिषद निवडणूक: कोण काय म्हणतो, याकडे लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९वरुड**

राज्यातील लोकसभा, विधानसभेत मित्रपक्षांची युती करून महाविकास आघाडी व महायुती या दोन प्रमुख आघाड्या उभ्या राहिल्या. महायुतीने केंद्रात व राज्यात सत्ता स्थापन केली, तर महाविकास आघाडी विरोधकांच्या भूमिकेत ठाम राहिली. मात्र तेच मित्रपक्ष आता नगरपरिषद निवडणुकीत स्वतंत्रपणे मैदानात उतरले असून, आगामी तीन दिवसांत नगरपरिषद निवडणुकीत ज्येष्ठ नेत्यांच्या सभांमुळे ऐन थंडीत ग्रामीण भागात तापमान वाढायला सुरुवात झाली आहे.महायुतीतील भारतीय जनता पार्टी, शिवसेना शिंदेगट, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) हे सत्तेत एकत्र असले तरी भद्रावतीत त्यांनी स्वतंत्र चूल मांडली आहे. त्यामुळे नेत्यांनाही आपल्या पक्षीय उमेदवारांच्या विजयाकरिता जोरदार प्रचारसभांची मालिका घेऊन मैदानात उतरावे लागत आहे.



**नेत्यांकडे लक्ष**

काँग्रेस, उद्धवसेना, राष्ट्रवादी (शरद पवार) आणि वंचित बहुजन आघाडी हे विरोधी मित्रपक्ष असले तरी या निवडणुकीत उद्धवसेनेने स्वतंत्रपणे वेगळी चूल मांडली आहे. काँग्रेसच्या प्रमुख नेत्यांसोबतच राष्ट्रवादी (शरद पवार गट) व वंचित बहुजन आघाडीची आघाडी मैदानात आहे. त्यामुळे या गटातील ज्येष्ठ नेते कोणती विधाने करतात, कोणावर हल्लाबोल करतात आणि विरोधातील कुणावर थेट निशाणा साधतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. बसपा व आम आदमी पार्टीही मैदानात उतरल्याने आरोप-प्रत्यारोपांचा भडिमार अधिक वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.


# भाजपचा मोठा प्रचार प्लॅन! नवनित राणा दोन दिवसांत १५ ठिकाणी जाहीर सभा,रोड शो

## विशेष हेलिकॉप्टरची सोय उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने प्रचाराला वेग देत विशेष मोहिम आखली आहे. यानुसार भाजप नेत्या आणि माजी खासदार सौ. नवनित राणा यांना पक्षाने महत्त्वाची जबाबदारी दिली असून त्या येत्या दोन दिवसांत विशेष हेलिकॉप्टरच्या माध्यमातून तब्बल १५ ठिकाणी जाहीर सभा आणि रोड शो घेणार आहेत. प्रत्येक ठिकाणी सुमारे एका तासाच्या अंतराने सलग प्रचार कार्यक्रम पार पडणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार विविध नगर परिषद व नगर पंचायत क्षेत्रांमध्ये हा प्रचार कार्यक्रम आखण्यात आला आहे. सौ. नवनित राणा यांच्या नेतृत्वगुणांना पक्षश्रेष्ठींनी दाद देत उमेदवारांच्या प्रचाराची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर सोपवली आहे.



या धडाकेबाज २ दिवसीय दौऱ्यात पांढरकवडा, यवतमाळ, अचलपुर, मोर्शी, वरुड, बुलढाणा, कनान, बेसा नागपूर, नरखेड, आकोट, तेल्हारा, काटोल, रामटेक यांसह अन्य काही महत्त्वाच्या ठिकाणांचा समावेश आहे. या सर्व ठिकाणी आयोजित सभा, संवाद कार्यक्रम आणि रोड शोमधून स्थानिक उमेदवारांना मोठे बळ मिळणार असल्याचे पक्षाकडून सांगण्यात येत आहे.

पूर्वीच्या निवडणुकांमध्ये सौ. नवनित राणा यांनी केलेला प्रभावी जनसंपर्क, त्यांच्या भाषणशैलीतील दम आणि लोकांशी जोडून घेण्याची क्षमता पाहता हा दौरा अत्यंत रणनीतिक मानला जात आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे प्रत्येक ठिकाणी मोठ्या प्रमाणात जनसागर उसळेल, असा पक्षाचा विश्वास आहे.

या प्रचार मोहिमेमुळे विदर्भातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता असून आगामी निवडणूक रणधुमाळीला नवीन गती मिळणार आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत